१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• मुंबई, शुक्रवार २४ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-५०, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 50 Marathi - Daily - Mumbai, 24 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

"जय पवारांचे २०२९ च्या उमेदवारीचे आतापासूनच संकेत?"

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### उद्धव ठाकरे हेच मविआचा चेहरा

**मुंबई** - काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज दुपारी १ वाजता उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर जाऊन भेट घेतली. आगामी विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही भेट राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले की, उद्धव ठाकरे हेच महाविकास आघाडीचा चेहरा असतील. हर्षवर्धन सपकाळ माध्यमांशी बोलताना म्हणाले की, राज्यसभेची निवडणूक संपन्न झाली आहे. यावेळी काँग्रेस लढू शकले नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र उद्धवजी जे आहेत हा महाविकास आघाडीचा चेहरा आहे आणि ते विधान परिषदेमध्ये जर जात असतील तर निश्चित आनंद होईल, हे यापूर्वीच सांगितलेले आहे. उमेदवारीच्या संदर्भात चर्चा आजच्या बैठकीमध्ये होणे हे काही अपेक्षित नव्हते. उद्धव ठाकरे यांची भूमिका काय होती यावर मी भाष्य करणे हे योग्य नाही.

### मराठवाड्यात ९० दिवसांत २१७ शेतकऱ्यांची आत्महत्या

**बीड** - मराठवाडा विभागात मागील तीन महिन्यांत २१७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. गेल्या महिन्यात झालेल्या अवकाळी पावसासह गारपिटीमुळे गव्हाचे उभे पीक भुईसपाट झाले. रब्बी हंगामातील नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गव्हावरच शेतकऱ्यांचा भर असतो. मात्र तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतल्याने कर्जबाजारी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या तीन महिन्यांत एकूण २१७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. मार्च महिन्यात सर्वाधिक ८२ आत्महत्या झाल्याची नोंद आहे. गेल्या वर्षी विभागात १,१२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती. त्यापैकी ७९६ शेतकरी कुटुंबांना शासनाकडून मदत देण्यात आली आहे. १४० प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली असून १९३ प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाने सुमारे ७ कोटी १० लाख रुपयांची मदत केल्याचे आयुक्तालयाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. अवकाळी संकट, उत्पादन खर्चात वाढ आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक तणावाखाली असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

### शिक्षिकेचा उष्माघाताने मृत्यू अहिल्यानगरात दुसरा बळी

**अहिल्यानगर** - अहिल्यानगर जिल्ह्यात वाढत्या उकाड्यामुळे उष्माघाताचे प्रमाण वाढत आहे. पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथे ५० वर्षीय शिक्षिका उषा पोपट फापाळे यांचा उष्माघाताने मृत्यू झाला. जिल्ह्यातील हा उष्माघाताचा दुसरा बळी ठरला आहे. उषा फापाळे या नेहमीप्रमाणे गारगुंडीहून दुचाकीवरून शाळेत गेल्या होत्या. दुपारी १२ वाजता शाळा सुटल्यानंतर त्या घरी पोहोचल्या, तेव्हा त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. अशक्तपणा, चक्कर येणे अशी लक्षणे दिसू लागल्याने त्यांना तातडीने कान्हूर पठार येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासणीनंतर डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्यांना अहिल्यानगर येथे हलवण्याचा सल्ला दिला. मात्र प्रकृती झपाट्याने खालावत गेल्याने उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. गेल्या आठवड्यात पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे उष्माघाताने ४५ वर्षीय हर्षदा रावसाहेब चौधरी यांचा मृत्यू झाला होता. कडाक्याच्या उन्हात मका कापत असताना त्या चक्कर येऊन कोसळल्या होत्या.

# आईच्या निवडीदिवशीच जय पवार आमदारकीसाठी उतावीळ! २०२९ ला विधानसभा लढणार!

■ बारामती



**बारामती विधानसभा मतदारसंघात आज अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागी पोटनिवडणुकीचे मतदान सुरू असतानाच सुनेत्रा पवार यांच्या अपेक्षित विजयावर न बोलता अजित पवार यांचे धाकटे पुत्र जय पवार यांनी उतावीळपणे आमदारकीची इच्छा बोलून दाखवली. ते म्हणाले की, २०२९ मध्ये मी उमेदवार असावे, अशी लोकांची मागणी आहे. म्हणजे आई आमदार होत असतानाच त्यांची जागा खेचून जय पवार यांना आमदार व्हायचे आहे. त्यांच्या या धक्कादायक विधानाने इतकी खळबळ माजली की, जय पवार यांना पत्रकार परिषद घेऊन सारवासारव करावी लागली, पण तीही पटण्यासारखी नव्हती.**

**जय पवार** यांनी २०२९ सालची निवडणूक लढवणार असल्याचे सुस्पष्ट संकेत देताच रोहित पवार म्हणाले की, मग २०२९ ची बारामती विधानसभा निवडणूक ही पवार विरुद्ध पवार अशी होईल. जय पवारच्या विरोधात शरद पवार गटाचे युगेंद्र पवार निवडणूक लढवतील.

बारामती पोटनिवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी जय पवार हे सुनेत्रा पवार यांच्यासोबत मतदान केंद्रावर आले होते. यावेळी त्यांना २०२९ च्या निवडणुकीबाबत थेट प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना जय म्हणाले की, २०२९ मध्ये मी उमेदवार व्हावे, अशी लोकांची मागणी आहे. परंतु मला पक्षाचा लहान कार्यकर्ता म्हणून काम करायचे आणि सर्वांना मदत करायची आहे. पुढे काय ते वेळ आल्यावर बघू. जय पवार यांच्या वक्तव्यानंतर २०२९ मधील बारामती विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीची चर्चा सुरू झाली आहे. अजित पवार यांचे थोरले पुत्र पार्थ पवार हे आता राज्यसभेचे खासदार आहेत. आई सुनेत्रा पवार यांच्या जागी निवड झाली आहे. सुनेत्रा पवार आता बारामती विधानसभेची पोटनिवडणूक जिंकल्या की त्या बारामती मतदारसंघाच्या आमदार होतील. २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत जय पवार त्यांची जागा घेतील, तेव्हा सुनेत्रा पवार या कुठून लढणार? की त्या राजकीय संन्यास घेणार? ही चर्चा सुरू झाली आहे.

जय पवार यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना आ. रोहित पवार म्हणाले की, भविष्यात बारामतीत पवार विरुद्ध पवार, अशी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकांना अशी लढत नको आहे, पण काहीजण त्यासाठी प्रयत्न करत आहेत. गेल्या वेळी लोकसभेची निवडणूक झाली, तेव्हा सुप्रिया पवार विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत झाली. त्यावेळी विधानसभा निवडणूक तरी पवार कुटुंबात होऊ नये, असे वाटत होते. परंतु विधानसभा निवडणूकही पवार विरुद्ध पवार अशी झाली. आता पुन्हा पवार विरुद्ध पवार निवडणूक होऊ नये, अशीच साहेबांचीही इच्छा आहे. जय पवार यांच्या वक्तव्यावर युगेंद्र पवार म्हणाले की, लोकशाहीत » पान ५ वर

## बारामती, राहुरीत मतदान

बारामती, राहुरीत आज पोटनिवडणुकीचे मतदान पार पडले. बारामतीत सुनेत्रा पवार यांना सर्व प्रमुख पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा दिला असला तरी एकूण २२ उमेदवार रिंगणात होते. राहुरीत भाजपाचे कर्डिले यांच्या विरोधात गोविंद मोकाटे, संतोष चाळके, रावसाहेब खेवरे आदि उमेदवार आहेत. राहुरी आणि बारामतीत मतदानाचा उत्साह नव्हता. बारामतीत ५८ टक्के तर राहुरी ५५ टक्के मतदान झाले. ४ मे रोजी निकाल आहे.

## शिवाजी कोण होता? प्रकाशकाला आमदार गायकवाडांची अर्वाच्च शिवीगाळ




**महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीतील बिनीचे शिलेदार राहिलेले विचारवंत आणि कम्युनिस्ट कार्यकर्ते दिवंगत गोविंद पानसरे यांनी सुमारे ३७ वर्षांपूर्वी 'शिवाजी कोण होता' हे पुस्तक लिहिले होते. या पुस्तकात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची थोरवीच लिहिलेली आहे. परंतु या पुस्तकाच्या शीर्षकावर आक्षेप घेत बुलडाणाचे शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करत शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याचा आरोप करत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली आणि जीभ हासडून मारण्याची धमकी दिली. भाजपाचे मंत्री गिरीष महाजन यांना अलिकडेच एका महिलेने भररस्त्यात जाब विचारला. यामुळे सामान्य माणूस खूश झाला. ही घटना ताजी असताना सत्ताधाऱ्यांची गुर्मी उतरलेली नाही हे गायकवाडांच्या गुंडगिरीच्या भाषेवरून दिसते.**

■ मुंबई

**शिवाजी** महाराजांविषयी एकेरी उल्लेख करणारा गोविंद पानसरे कोण, असाही सवाल ताळतंत्र सुटलेल्या आ. गायकवाड यांनी केला. या संतापजनक प्रकाराची ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यावर महाराष्ट्रातून त्यांचा निषेध होत आहे. आ. गायकवाड प्रकाशकाला फोन करून म्हणाले की, एका कार्यक्रमात हे पुस्तक माझ्या पत्नीला देण्यात आले. तिने हे पुस्तक घरी आणल्यावर मी ते वाचले. त्यामध्ये छत्रपती शिवरायांच्या » पान ७ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

### वादग्रस्त आमदार

बुलडाणा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांची कारकीर्द कायम वादग्रस्त राहिली आहे. ते २०१९ मध्ये ते पहिल्यांदा विधानसभेवर निवडून आले. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी पुन्हा ही जागा जिंकली. त्यांचे शिक्षण नववीपर्यंत झालेले आहे. गेल्या वर्षी मुंबईत आकाशवाणी आमदार निवासस्थानी शिळ्या अन्नावरून त्यांनी » पान ७ वर

## प. बंगाल, तामिळनाडूत विक्रमी मतदान

■ कोलकाता

**पश्चिम** बंगाल व तामिळनाडू या देशातील दोन प्रमुख राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांसाठी आज विक्रमी मतदान झाले. पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यातील १५२ जागांवर ९२.६४ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला, तर तामिळनाडूमधील सर्व २३४ जागांवर एकाच वेळी होत असलेल्या निवडणुकीमध्ये ८५.१३ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. २०२१ च्या निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये ८५ टक्के आणि तामिळनाडूत ७६.०६ टक्के मतदान झाले होते.

पश्चिम बंगाल निवडणुकीत काही ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या. दक्षिण मिदनापूर जिल्ह्यातील कुमारगंज मतदारसंघातून भाजपा उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावर हल्ला झाला. त्यांचा सुरक्षारक्षक त्यांच्यासोबत असताना जमावाने सुवेंदू यांना मारहाण केली. बर्नपूरच्या रहमतनगर भागात आसनसोल साउथ मतदार संघातील भाजपा आमदार व उमेदवार अग्निमित्रा पॉल यांच्या गाडीवरही हल्ला झाला. घटनेच्या वेळी त्या गाडीतच होत्या. या हल्ल्यात त्यांच्या गाडीच्या मागील काचेचा चुराडा झाला. अग्निमित्रा यांनी हिरापूर पोलीस » पान ५ वर



## सोने-चांदीच्या दरात घसरण डॉलर मजबूत झाल्याचा परिणाम

■ मुंबई

**मध्यपूर्वेतील** तणाव निवळण्याचे संकेत अद्याप धुसर असल्याने जागतिक बाजारात डॉलर पुन्हा मजबूत झाला आहे. त्याचा परिणाम म्हणून भारतीय वायदे बाजारात सोने-चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. एमसीएक्सवर या घसरणीचे स्पष्ट पडसाद उमटले.

सोन्याच्या दरात १,२०० रुपयांची घसरण झाली असून चांदीच्या दरात तब्बल ५,००० रुपयांपर्यंत घसरण नोंदवली गेली आहे. जीएसटीसह सोन्याचे दर प्रति १० ग्रॅम सुमारे १.५५ लाखांवर, तर चांदीचे दर प्रति किलो सुमारे २.५५ लाखांपर्यंत खाली आले आहेत. जळगाव येथील सुवर्ण बाजारपेठेतही घसरणीचा परिणाम दिसून आला. बुधवारी २४ कॅरेट सोन्याचे दर तीन टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १,५७,०७५ रुपयांपर्यंत आले होते. आज आणखी १,१३३ रुपयांची घट होऊन दर १,५५,९४२ रुपयांवर पोहोचले. चांदीच्या दरातही घसरण नोंदवली. बुधवारी प्रति किलो दर २,५९,५६० रुपयांवर आले होते. गुरुवारी आणखी ४,१२० रुपयांनी घसरून ते २,५५,४४० रुपयांपर्यंत खाली आले.

## रिक्षा-टॅक्सीवाल्यांची परीक्षा मराठी परिच्छेद लिहून दाखवायचा

■ मुंबई

**राज्यात** टॅक्सी, रिक्षा चालकांनी प्रवाशांशी मराठीत संवाद साधणे कायद्याने अनिवार्य करण्यात आल्यानंतर



आता या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने पुढचे पाऊल उचलले आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) मार्फत १ मे पासून चालकांची प्रत्यक्ष (इन-पर्सन) मराठीची लेखी व तोंडी परीक्षा घेतली जाणार आहे. जे या परीक्षेत नापास होतील त्यांचे लायसन्स रद्द होऊ शकते. रिक्षा-टॅक्सी युनियन या विरोधात ४ मे पासून आंदोलन करणार आहे.

१ मे २०२६ पासून या नियमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. चालकांना आरटीओ अधिकाऱ्यांसमोर थेट मराठी भाषेचे कौशल्य दाखवावे लागेल. साधा संवाद मराठीत साधता येतो का, याची चाचणी घेतली जाईल. मराठीतील ट्रॅफिकचे फलक, कागदपत्रे वाचणे आणि मराठीत लहान परिच्छेदही लिहून » पान ७ वर

## भारत नरकाचे द्वार! ट्रम्प यांची पोस्ट मुलांना जन्म देऊन कुटुंब बोलावतात

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक वादग्रस्त आणि संतापजनक पत्र पोस्ट केले आहे. त्यामध्ये भारत आणि चीनला 'हेल होल' म्हणजे नरकाचे द्वार असे संबोधले आहे. हे पत्र कट्टर विचारांचे अमेरिकन लेखक आणि रेडिओ होस्ट मायकेल सेव्हेज यांचे असून त्यात म्हटले आहे की, इथे जन्मलेले बाळ लगेच नागरिक बनते आणि मग ते चीन, भारत किंवा जगातील इतर नरकासारख्या कोणत्याही देशातून संपूर्ण कुटुंब इथे आणतात.

या पत्रात जन्माच्या आधारावर नागरिकत्व देण्यावर टीका करण्यात आली असून भारत-चीनसह अनेक देशांबाबत वादग्रस्त टिप्पणी करण्यात आली आहे. या पत्रात असे लिहिले आहे की, स्थलांतरित लोक आपल्या मुलांना जन्माच्या आधारावर नागरिकत्व मिळवून देतात आणि त्यानंतर संपूर्ण कुटुंब अमेरिकेत आणतात. जन्मसिद्ध नागरिकत्व (बर्थराइट सिटिजनशिप) कायद्याची टीका करताना पत्रात असे म्हटले आहे की, या विषयाचा निर्णय न्यायालये किंवा वकिलांनी नव्हे, » पान ७ वर

## मनसेच्या आक्रमक भूमिकेनंतर मध्य रेल्वे परीक्षेत मराठीचा समावेश

■ मुंबई

**मध्य** रेल्वेच्या भरती परीक्षेत मराठी भाषेला वगळल्याच्या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या वादानंतर अखेर प्रशासनाने यू-टर्न घेत मराठीचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. मनसे युवा नेते अमित ठाकरे यांच्या आक्रमक भूमिकेनंतर हा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे.

मध्य रेल्वेने १६ मार्च रोजी जाहीर केलेल्या अधिसूचनेत संगणक-आधारित परीक्षेसाठी केवळ हिंदी आणि इंग्रजी या भाषांचा पर्याय दिला होता. महाराष्ट्रात भरती प्रक्रिया होत असतानाही मराठीला वगळण्यात आल्याने उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. या निर्णयाविरोधात मनसे आक्रमक झाली.

अमित ठाकरे यांनी या मुद्द्यावर तीव्र प्रतिक्रिया देत मराठी तरुणांवर अन्याय होत असल्याचा आरोप केला होता.



त्यांनी मराठीचा समावेश न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता. मनसेच्या या भूमिकेनंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने पावले उचलली. १६ मार्चची अधिसूचना रद्द करून सुधारित अधिसूचना जारी करण्याचा निर्णय घेतला.

## सुरतच्या रस्त्यावर 'भूत सायकल'चे आश्चर्य

**सुरतच्या रस्त्यांवर एक अशी सायकल धावताना दिसली की, पाहणाऱ्यांना काही क्षण स्वतःच्या डोळ्यांवरच विश्वास बसेना. कारण त्या तीन चाकी सायकलवर कोणीच बसलेले नव्हते. ती स्वतःच चालत होती. यामुळे लोक थबकले, गर्दी वाढली, मोबाईल कॅमेरे सुरू झाले आणि सगळ्यांच्या मनात एकच प्रश्न घुमू लागला, ही सायकल चालवतेय तरी कोण? याचे उत्तर जाणून घेण्याचा प्रयत्न एका भन्नाट तंत्रज्ञानकथेपर्यंत घेऊन जातो. ही कथा कल्पकता, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तरुणांची जिद्द यांनी भरलेली आहे. त्यातून सुरत शहरात कुतूहलाचा विषय ठरलेली ही सायकल जन्माला आली आहे. या सायकलच्या वैशिष्ट्यपूर्ण तंत्रज्ञानामुळे लोकांनी तिला 'भूत सायकल' असे नाव दिले.**

### नव्या तंत्रज्ञानाने लोकांचे डोळे विस्फारले



■ सुरत

**ही सायकल** दिसायला सर्वसामान्य सायकलसारखीच आहे. पण ही सायकल कोणताही चालक नसतानाही स्वतःच रस्त्यावर चालते, वळते, थांबते आणि पुन्हा सुरूही होते, हे तिचे वैशिष्ट्य. त्यामुळे पहिल्यांदा पाहणाऱ्याला ही काहीतरी जादूच वाटते. पण ती जादू नसून नवतंत्रज्ञान आहे. शिवम मौर्य आणि गुरप्रीत अरोरा या दोन तरुणांनी ही सायकल बनवली आहे. दोघेही बी.टेकचे विद्यार्थी असून त्यांना बालपणापासूनच तंत्रज्ञानात प्रचंड रस होता. खेळण्यांच्या गाड्या उघडून त्यात काय » पान ७ वर

## ब्रिटनमध्ये २००८ नंतर जन्मलेल्या नागरिकांना तंबाखू खरेदीवर बंदी

■ लंडन

**ब्रिटनने** धूम्रपान रोखण्यासाठी अत्यंत कठोर आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. नव्या कायद्यानुसार २००८ नंतर जन्मलेल्या नागरिकांना आयुष्यभर तंबाखूजन्य पदार्थ खरेदी करता येणार नाहीत. संसदेमधील दोन्ही सभागृहांनी संबंधित विधेयक मंजूर केले असून आता केवळ औपचारिकता बाकी आहे. त्यानंतर हा कायदा इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड या संपूर्ण ब्रिटनमध्ये लागू होणार आहे. १ जानेवारी २०२७ पासून त्याची अंमलबजावणी सुरू होईल.

नव्या तरतुदीनुसार तंबाखू खरेदीसाठी किमान वयाची अट



दरवर्षी एक वर्षाने वाढवली जाईल. म्हणजे २०२७ मध्ये किमान वय १८ वर्षे असेल, तर २०२८ मध्ये ते १९ वर्षे, २०२९ मध्ये २० वर्षे असे वाढत जाईल. परिणामी २००९ किंवा त्यानंतर जन्मलेल्या व्यक्तींना भविष्यात कधीही कायदेशीररीत्या सिगारेट किंवा तंबाखू खरेदी करता येणार नाही. दुकानदारांना प्रत्येक ग्राहकाचे वय तपासणे बंधनकारक राहील. अल्पवयीन व्यक्तीला तंबाखू विकल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल. तंबाखू विक्रेत्यांना नोंदणी करावी लागेल. जाहिरात, प्रचार आणि आकर्षक विक्री पद्धतींवरही कठोर निर्बंध असतील. यानुसार शाळा, रुग्णालये, मुलांच्या खेळण्याची ठिकाणे आणि अनेक बंदिस्त जागांमध्ये त्यांचा वापर करता येणार नाही.

नवाकाळ
Email- contact@navakal.in  www.navakal.in  /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC254740}

बालाजी पेस्ट कंट्रोल कंपनीसाठी टेक्निशियन पाहिजेत पगार 18000/- कांदिवली पश्चिमः **9769723507** {NC260255}

कल्याण येथे गव्हर्नमेंट लायसन इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर साठी इंजिनिअर, सुपरवाइजर, हेल्पर्स पाहिजेत. संपर्क **8080619999** {NC260282}

बुक बाईंडर पाहिजे, सेंटर पिनिंग, परफेक्ट बाईंडिंग, हार्ड बाईंडिंग कामाचे अनुभवी उमेदवार हवा Alpha Digital Prints, दहिसर, पगार 20,000 पर्यंत. संपर्कः **9869483826** {NC260277}

अनुभवी स्क्रीन प्रिंटर, हेल्पर आणि डिलिव्हरी बॉयची नाहूर येथे आवश्यकता आहे. संपर्कः **7506632363** {NC260274}

बिस्लेरी बॉटलच्या डिलीव्हरीसाठी मुले पाहिजेत. दादर, प्रभादेवी. संपर्कः **9892307267/ 7666255660** {NC260290}

मुंबईतील नामांकीत हॉटेलसाठी हेल्पर, वेटर, पाणी कपडा, कामगार पाहिजेत, PF, ESIC, राहण्याची सुविधा उपलब्ध. **9892378151, 9769565469** {NC260296}

कुरीअर कंपनीमध्ये पिकअप व डिलीव्हरी साठी त्वरीत मुले पाहिजेत ठिकाण- फोर्ट, दादर, लोअरपरेल, वडाळा, नवी मुंबई दररोज रोख ६००/- + प्रवास खर्च Speedman Express 191-B, 9th Cavel Cross lane, 1st floor, Dr. viegas street, Near Barretto high School, Chirabazar, Mumbai- 400002. Note- फोन न करता ऑफीसमध्ये येणे. {NCC260009}

## पाहिजेत

मिठाईच्या दुकानात हाऊसकीपिंगसाठी अनुभवी मुलगा पाहिजे, 9 तास 13200- बोरीवली, माटुंगा, घाटकोपर, **9699927271** {NC260299}

सुरक्षा गार्ड भरती मुंबई सॅलरी 18-25 रहाणे खाणे फ्री **9925736285** {NC260188}

तात्काळ भरती- उत्तम करिअर संधी! Force Facility Management Services, Goregaon West फॅसिलिटी राउंडर. एरिया मॅनेजर तात्काळ गरज आकर्षक व वेळेवर पगार कामाचे ठिकाणः संपूर्ण मुंबई संपर्कः **8850103914/ 7506366043** {NC260256}

**ऑफसेट प्रिंटींग प्रेसमध्ये काम करण्यास हेल्पर पाहीजेत. तसेच ऑफसेट बॉयलर, पंचिंग मशीन, लॅमिनेशन मशीन, फोल्डिंग मशीन, परफेक्ट बाईंडिंग मशीन व स्क्रीन प्रिंटिंगसाठी ऑपरेटर पाहीजेत. कल्याण स्टेशनवरून कंपनीपर्यंत जाण्यासाठी बसची व्यवस्था व राहण्याची व्यवस्था आहे.**
संपर्क
**9224455770**

सिक्युरिटी हाऊसकिपिंग कंपनीला-सेल्स / मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटंट, ॲडमिन, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, सिक्युरिटीगार्ड / सुपरवायजर हाऊसकिपिंग मुले / मुली पाहिजेत- **7208004613/ 14** {NC260136}

सुरक्षारक्षक, हाऊसकिपींग- दादर, गोवंडी, वरळी, मुंबईसेंट्रल, ठाणे. **8291056761/ 8422880515/7506129517/ 9326200875** {NC260249}

२ कलर मशीनसाठी बॉयलर व फिडरमेन पाहीजे संपर्क- **9820903819** {NC260301}

रेडीमेड कपड्यांसाठी डिलिव्हरी बॉय आवश्यक आहे. वय २५/४० वेळ सकाळी १० ते ९.३० दादर पूर्व. संपर्क- **9320007951** {NC260251}

## पाहिजेत

भांडूप येथे सीडी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर, पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, पाहिजे संपर्कः **9820930362/ 9930589715** {NC260212}

कंपनीला बँक कामासाठी फुलटाईम/ पार्टटाईम मुले पाहिजेत पार्टटाईम बाईक राईडर्स पाहिजेत चांगला पगार अर्ज रेशनकार्डसहित भेटा- दुपारी 11 ते 9 स्पिडलिंक कुरीयर शॉप नं 3 आनंद अपार्टमेंट तेलीगल्ली क्रॉसरोड अंधेरी पूर्व {NC260261}

हाऊसकीपिंग, पेस्ट कंट्रोल कामासाठी माणसे हवी. पगारः 14000 ते 20000 (PF, ESIC कापून) ठिकाणः मुंबई संपर्कः **9137144801** {NC260265}

पाहिजेत महिला डेन्टल असिस्टंट/ रिसेप्शनिस्ट आणि ड्रायव्हर- डॉ. कर्वेज डेन्टेक ठाणे पश्चिम. (ठाणे, मुलुंड, कळवा राहणाऱ्यांना प्राधान्य) संपर्क- **8779790919** (संपर्क वेळ दुपारी १२:००- सायंकाळी ७:०० फक्त) ईमेलः dentecha03@gmail.com {NC260286}

आयुर्वेदिक हेल्थकेअर कंपनीत नोकरीची सुवर्णसंधी! ट्रेनर लीडर मॅनेजर पदासाठी भरती! डायरेक्ट सेलिंगमध्ये कुठेही काम केले असेल तर भेटा. फ्रेशर विद्यार्थी मार्केटिंग स्किल शिका व प्रमाणपत्र मिळवा. वय 18 ते पुढे इच्छुक. पगार 15000/- ते 25000/- संपर्कः **7506576335** {NC260239}

24 तास राहणारी मुलगी किवा बाई वय : 20 ते 40, दहिसर (ईस्ट) येथे जेवण आणि घर कामासाठी पाहिजेत. पगारः 18,000 महिना. संपर्कः **9820056098** {NC260303}

4/5 कलर 20x28 हेडलबर्गसाठी बॉयलर, फिडरमेन पाहिजेत. सुमंगल प्रिंटर्स - भांडुप (वेस्ट): **9867316567**. {NC260300}

दुकानात काम करण्यासाठी मुलगा/मुलगी पाहिजे पत्ताः राजुभाई हरगोविंदास, शॉप नं.८, रूबी अपार्टमेंट, एम. व्ही. रोड, विशाल हॉलजवळ अंधेरी पूर्व, मुंबई ४०००६९ {NC260302}

खार येथे कुरीअर बॉईज पाहिजे. बायोडेटासह अर्ज करा. संपर्कः **9930011100** {NC260304}

## Situation Vacant

Urgently Reqd Male / Female Graphic Designer & Artist Full Exp of CoralDraw & Photoshop. whatsup : **8433875801** {NC260296}

## Situation Vacant

"Required Logistic Executives & Office Assistant, Graduate & Knowing Tally, at Kandivali (West)". Email: sales@kscl.co.in/ **08976878795** {NC260284}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260031}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC260200}

## वधू वर मेळावा

हेमांगी वधू-वर मेळावा दिनांक २६/४/२०२६ ५००/- नोंदणी फी+ स्वतःचा बायोडाटा आणावा. समाजाची + शिक्षणाची आणि वयाची अट नाही. वेळ १० ते ४ पर्यंत. ठिकाण- शारदा मंदिर संस्था, लाल चौकी, कल्याण (प), जि.ठाणे. संपर्क- आदित्य मोडक- **9619238732** {NC260006}


### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# मिठी नदी प्रकल्प घोटाळा प्रकरणी मुख्य आरोपी केतन कदमला जामीन

■ मुंबई

**मिठी** नदी प्रकल्प घोटाळा प्रकरणातील मुख्य आरोपी केतन कदमला अखेर मुंबई उच्च न्यायालयाकडून वर्षभरानंतर जामीन मंजूर करण्यात आला आहे.

मिठी नदीतील गाळ काढण्याच्या प्रकल्पात मध्यस्थ म्हणून काम पाहणाऱ्या केतन कदम याला ईडीने पालिकेच्या आर्थिक गुन्हे शाखेने ७ मे २०२५ रोजी दाखल केलेल्या गुन्ह्यानंतर अटक केली होती. या प्रकरणात कंत्राटांच्या अंमलबजावणीत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप आहे. सत्र न्यायालयाने जामीन नाकारल्यानंतर केतन कदमने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्या. आर. एम. जोशी यांच्या एकलपीठापुढे या याचिकेवर सुनावणी झाली. आरोपी गेल्या वर्षभरापासून कोठडीत असून अद्याप खटल्याची सुनावणी सुरू झालेली नाही.

# मुंबई-गोवा महामार्गावर टोलवसुलीसाठी हालचाली सुरू! उबाठाचा तीव्र विरोध

■ कणकवली

**मुंबई-गोवा** राष्ट्रीय महामार्ग म्हणजे एनएच ६६ चौपदरीकरणाला गती मिळत असतानाच आता टोल वसुलीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली-कसाल दरम्यान असलेल्या ओसरगाव टोल नाक्यावर लवकरच टोल वसुली सुरू होण्याची शक्यता असून यासाठी १७ एप्रिल रोजी ऑनलाईन निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# प्रसिद्ध बिकाजी ब्रँडचे संस्थापक शिवरतन अग्रवाल यांचे निधन

■ चेन्नई

**बिकाजीचे** संस्थापक शिवरतन अग्रवाल यांचे पत्नीच्या हार्ट बायपास शस्त्रक्रियेनंतर काही दिवसांत चेन्नई येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते बिकाजी फूड्स इंटरनॅशनलचे संस्थापक होते. पत्नीच्या हार्ट बायपास शस्त्रक्रियेनंतर त्यांच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी ते चेन्नईमध्ये होते. आज सकाळी त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथेच त्यांची प्राणज्योत मालवली.



शिवरतन अग्रवाल यांनी १९९३ मध्ये बिकानेर येथे 'बिकाजी' ब्रँडची स्थापना केली होती. शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यापासून १३,४३० कोटी रुपयांच्या बिकाजी फूड्स इंटरनॅशनलपर्यंतचा त्यांच्या यशाचा प्रवास आहे. इयत्ता ८ वीपर्यंतचे शिक्षण घेऊन अब्जावधी रुपयांचे साम्राज्य उभे करण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास भारतातील सर्वात प्रेरणादायी उद्योजकच्या कहाण्यांपैकी एक मानला जातो. राजस्थानातील बिकानेर येथील अग्रवाल यांनी १९८६ मध्ये शिवदीप प्रॉडक्ट्सची स्थापना केली. पुढे त्याचे बिकाजी फूड्स इंटरनॅशनलमध्ये रुपांतर झाले. १९९३ मध्ये बिकाजी ब्रँडची सुरुवात ही एक महत्त्वाची ठरली. त्यांनी पारंपरिक बिकानेरी चव आणि आधुनिक उत्पादन व वितरण पद्धती यांचा उत्तम संगम साधला. गुणवत्ता, नावीन्य आणि विस्तार यांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे कंपनी सातत्याने वाढत गेली. दोन दशकांहून अधिक काळात त्यांनी बिकाजीला भारतातील आघाडीच्या पॅकेज्ड स्नॅक्स कंपन्यांपैकी एक बनवले.

भुजिया, नमकीन, मिठाई आणि इतर पॅकेज्ड स्नॅक्स अशा विविध उत्पादनांमुळे ग्राहकांचा विश्वास जिंकत कंपनीने जागतिक कंपन्यांना टक्कर दिली. नोव्हेंबर २०२२ मध्ये बिकाजी फूड्सचे स्टॉक एक्स्चेंजवर सूचीबद्ध झाले आणि आयपीओ किमतीपेक्षा जास्त दराने त्यांनी सुरुवात केली. २०२४ मध्ये फोर्ब्सच्या जागतिक अब्जाधीशांच्या यादीत स्थान मिळाल्यामुळे अग्रवाल यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरही मान्यता मिळाली.

# 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' नंतर आता माजी लष्करप्रमुख नरवणे यांचे नवे पुस्तक

■ नवी दिल्ली

**माजी** लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांचे 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' हे आत्मचरित्र चर्चेत आहे. प्रकाशक पेंग्विन रँडम हाऊसने स्पष्ट केले आहे की, हे पुस्तक अद्याप अधिकृतपणे प्रकाशित झालेले नाही. या पुस्तकावरून संसदेच्या मागील अधिवेशनात प्रचंड गदारोळ झाला होता. आता मनोज नरवणे यांचे 'द क्यूरियस अँड द क्लासिफाईडः अनथिंग मिलिटरी मिथ्स अँड मिस्टरीज' हे नवीन पुस्तक लिहिले असून ते 'रुपा' प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या पुस्तकातून प्रेरणा घेऊन नरवणे यांनी हे पुस्तक लिहिले आहे.

पुस्तकाबद्दल जनरल नरवणे म्हणाले की, भारतीय सैन्यदलातील आजवर फारशा समोर न आलेल्या, विलक्षण आणि रंजक बाबींवर यांनी प्रकाश टाकला आहे. हे पुस्तक कोणताही शैक्षणिक प्रबंध किंवा स्पर्धा परीक्षेचे गाईड नाही. भारतीय लष्करातील लष्करी मूल्ये आणि संस्कृती सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावी हा यामागील उद्देश आहे. बाबा हरभजन सिंग यांची शौर्यगाथा, आयएनएस खुकरीचा इतिहास आणि सैन्यदलातील मुक्या जनावरांचे म्हणजे पेदोंगी नावाच्या खेचराचे योगदान अशा अनेक विषयांचा यात समावेश आहे.

# लहान मुलांना दाताने उचलणाऱ्या भोंदू चेतन बाबावर गुन्हे दाखल

**अकोला-** जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील निंबा गावात उपचाराच्या नावाखाली लहान मुलांवर अमानुष कृत्य करणाऱ्या भोंदू चेतन मुळे याच्यावर अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चेतन सुनील मुळे उर्फ गुलाल शेषबाबा म्हणून ओळखला जाणारा हा भोंदू दरबार भरवून लोकांची दिशाभूल करत होता. चेतन मुळे हा अकोल्यातील निंबा गावात दरबार भरवायचा. तो दहावी नापास आहे. दरबारात लिंबू फेकणे, कोडे सोडवणे व अमानुष कृत्य करणे असे अनेक प्रकार तो दरबारात करायचा. या दरबारात तो आजार बरे करण्याच्या नावाखाली लहान मुलांना दाताने उचलून हवेत फिरवणे, खिळ्यांच्या आसनावर बसवणे यांसारखे धोकादायक आणि अघोरी प्रकार करत असल्याचा धक्कादायक व्हिडिओ व्हायरल झाला होता.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# गोवंडीत सीएनजीचा स्फोट! ८-१० वाहने जळून खाक

■ मुंबई

**मुंबईतील** गोवंडीतील शिवाजीनगर परिसरात उभ्या असलेल्या एका गाडीतील सीएनजी गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन आग लागल्याची घटना आज दुपारी घडली. या आगीत शेजारी उभ्या असलेल्या ८ ते १० मोटारगाड्या जळून खाक झाल्या असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

ही घटना मानखुर्द-घाटकोपर जोड रस्त्यावरील शिवाजीनगर परिसरात दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास घडली. रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात वाहने उभी असताना एका मोटारगाडीतील सीएनजी सिलिंडरचा अचानक स्फोट झाला. स्फोटानंतर संबंधित वाहनाला तात्काळ आग लागली आणि काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केले. आगीची तीव्रता वाढत गेल्याने शेजारी उभ्या असलेल्या इतर वाहनांनाही आग लागली. काही स्थानिक रहिवाशांनी सुरुवातीला आग विझवण्याचा प्रयत्न केला; मात्र ज्वाळा वाढत असल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. त्यानंतर तातडीने अग्निशमन दलाला कळवण्यात आले. मुंबई अग्निशमन दलच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्यानंतर आग नियंत्रणात आणण्यात आली. तोपर्यंत ८ ते १० वाहने पूर्णपणे जळून खाक झाली होती.

# राधाकृष्ण विखे पाटील विरूद्ध विवेक कोल्हे भाजपा नेत्यांच्या कारखान्याचा वाद सुप्रीम कोर्टात

■ मुंबई

**अहिल्यानगर** जिल्ह्यातील भाजपा नेते व मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भाजपाचे विवेक कोल्हे यांच्यातील सहकार क्षेत्रातील वाद आता देशाच्या सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. राहाता तालुक्यातील श्री गणेश सहकारी साखर कारखाना आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना यांच्यातील करारावरून हा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणावर प्राथमिक सुनावणी करताना न्या.पामिडीघंटम श्री नरसिंहा आणि न्या. आलोक अराधे यांच्या खंडपीठाने श्री गणेश कारखान्याला तीन आठवड्यांची नोटीस बजावली आहे. पुढील आदेशापर्यंत कारखान्याच्या मालमत्तेवर कोणताही नवीन बोजा निर्माण करू नये, असे महत्त्वपूर्ण 'जैसे थे'चे आदेश दिले आहेत. पुढील सुनावणी २२ मे रोजी होणार आहे. यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने विखे पाटील कारखान्याची याचिका तांत्रिक कारणांवर फेटाळली होती. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले.

# वाळू उपसा, वृक्षतोड विरोधात वसईकरांचे उद्या आंदोलन

■ वसई

**वसई** तालुक्यातील वाढता पर्यावरण ऱ्हास, बेकायदेशीर वाळू उपसा आणि वृक्षतोडीविरोधात वसईकरांनी शनिवार २५ एप्रिल रोजी तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. सामाजिक कार्यकर्ते एलायस डिसिल्वा यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन वसई तहसील कार्यालयासमोर सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे.

प्रशासनाने या आंदोलनाची दखल न घेतल्यास बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. रात्रीच्या अंधारात जलस्त्रोत आणि निसर्ग नष्ट केला जात आहे, याविरोधात कारवाईची करण्यासाठी तसेच खाजगी जागांच्या नावाखाली सुरू असलेला भराव आणि झाडांची कत्तल थांबवण्यासाठी हा मोर्चा आहे. बावखले नष्ट झाल्यामुळे पाण्याची पातळी खालावल्याने पर्यावरणप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे. तक्रार करूनही प्रशासन ठोस कारवाई करत नसल्याने वसईकर आक्रमक झाले आहेत. वसईतील सर्व खाजगी व शासकीय जलस्त्रोतांचे तातडीने सर्वेक्षण करावे.

# आजचे राशी भविष्य

शुक्रवार ता. २४ एप्रिल २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | मौजमजेत शांतचित्ताने दिवस व्यतीत करणे योग्य ठरेल. भावनांच्या आहारी न जाता व्यवहाराला महत्त्व द्या. |
| वृषभ | निर्धारपूर्वक वाटचाल सकारात्मक फलिते देईल. कामाची प्रशंसा होईल. गुणांना वाव मिळेल. |
| मिथुन | मेहनतीने परिस्थिती अनुकूल करावी लागेल. मोठे आर्थिक निर्णय लांबणीवर टाकणे हिताचे ठरेल. पोट सांभाळा. |
| कर्क | यशदायक दिवस. कौटुंबिक शुभकार्ये आनंद देतील. नवीन ओळखी होतील. |
| सिंह | मानसिक ताण जाणवेल. भावनांचा अतिरेक टाळा. जोडीदाराशी सामंजस्य ठेवणे महत्त्वाचे राहील. |
| कन्या | जबाबदाऱ्यांचा प्राधान्यक्रम ठरवावा लागेल. स्वत:च्या क्षमतांची ओळख पटेल. अमाप पैसा मिळेल. |
| तूळ | अनेक पर्याय समोर येतील. निवडीची संधी मिळाल्याचा फायदा घ्या. मनाजोगता पैसा खर्च करता येईल. |
| वृश्चिक | संयम बाळगल्यास दिवस चांगला जाईल. भावनांवर ताबा ठेवा. कामात चुका टाळा. |
| धनु | कोणत्याही आमिषाला बळी पडू नका. पैसा हाती राहात नसल्याची खंत वाटेल. मानसिक अस्थिरता जाणवेल. |
| मकर | संभाषणकौशल्याने कामे साध्य होतील. कौटुंबिक प्रश्नांवर चर्चेस अनुकूल दिवस. वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. |
| कुंभ | महत्त्वाच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करणे योग्य ठरेल. नोकरीत कामाचा गौरव होईल. |
| मीन | जबाबदाऱ्या वाढतील. झटपट फलिताची अपेक्षा नको. मनाविरुद्ध खर्च करावा लागेल. |

# लॉटरी

## महाराष्ट्र आकर्षक पुष्पराज विकली लॉटरी

सोडत दर गुरुवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 17 • सोडत दिनांक 23/04/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **AP-03 : 4954**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **4954** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली; प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **0405** — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0201 | 0729 | 1415 | 2103 | 3312 | 3528 | 3665 | 6580 | 7522 | 8080 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0001 | 0514 | 1611 | 3639 | 4224 | 4914 | 5961 | 7419 | 8888 | 9923 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0639 | 1348 | 1540 | 2307 | 2393 | 2791 | 3443 | 4344 | 4449 | 6179 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0468 | 2591 | 2608 | 3170 | 3273 | 3319 | 4059 | 4563 | 7203 | 8105 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1216 | 2226 | 3071 | 3631 | 4224 | 4788 | 5574 | 6363 | 6920 | 7809 | 8479 | 9345 |
| | | 1261 | 2246 | 3072 | 3633 | 4254 | 4798 | 5575 | 6401 | 6943 | 7812 | 8543 | 9401 |
| | | 1275 | 2267 | 3120 | 3635 | 4260 | 4844 | 5590 | 6428 | 6946 | 7819 | 8586 | 9429 |
| | | 1359 | 2273 | 3121 | 3637 | 4303 | 4846 | 5594 | 6447 | 6966 | 7823 | 8594 | 9432 |
| | | 1371 | 2278 | 3122 | 3648 | 4308 | 4871 | 5606 | 6449 | 7007 | 7829 | 8604 | 9498 |
| 0001 | 0545 | 1401 | 2283 | 3133 | 3682 | 4340 | 4920 | 5616 | 6463 | 7025 | 7855 | 8616 | 9499 |
| 0013 | 0551 | 1411 | 2322 | 3139 | 3687 | 4374 | 4927 | 5652 | 6464 | 7031 | 7920 | 8637 | 9504 |
| 0014 | 0572 | 1445 | 2327 | 3174 | 3731 | 4403 | 4938 | 5714 | 6465 | 7062 | 7947 | 8670 | 9512 |
| 0057 | 0659 | 1481 | 2345 | 3197 | 3733 | 4404 | 4968 | 5717 | 6467 | 7112 | 7970 | 8683 | 9519 |
| 0061 | 0672 | 1486 | 2355 | 3224 | 3754 | 4413 | 4984 | 5746 | 6470 | 7172 | 7973 | 8688 | 9528 |
| 0070 | 0702 | 1489 | 2416 | 3233 | 3774 | 4415 | 5011 | 5758 | 6482 | 7196 | 7976 | 8698 | 9548 |
| 0074 | 0733 | 1536 | 2459 | 3234 | 3780 | 4417 | 5041 | 5805 | 6511 | 7206 | 8026 | 8774 | 9564 |
| 0077 | 0742 | 1599 | 2466 | 3239 | 3792 | 4419 | 5059 | 5815 | 6526 | 7210 | 8034 | 8782 | 9569 |
| 0092 | 0826 | 1621 | 2557 | 3243 | 3800 | 4440 | 5082 | 5837 | 6533 | 7232 | 8061 | 8792 | 9577 |
| 0103 | 0831 | 1627 | 2559 | 3261 | 3809 | 4441 | 5086 | 5859 | 6549 | 7235 | 8087 | 8809 | 9590 |
| 0153 | 0861 | 1646 | 2582 | 3283 | 3834 | 4443 | 5089 | 5881 | 6574 | 7237 | 8098 | 8816 | 9591 |
| 0163 | 0887 | 1664 | 2604 | 3288 | 3872 | 4444 | 5099 | 5910 | 6576 | 7266 | 8126 | 8831 | 9592 |
| 0175 | 0899 | 1683 | 2618 | 3296 | 3887 | 4447 | 5103 | 5929 | 6580 | 7267 | 8152 | 8851 | 9596 |
| 0182 | 0909 | 1686 | 2652 | 3303 | 3892 | 4448 | 5122 | 5938 | 6612 | 7304 | 8178 | 8852 | 9597 |
| 0197 | 0918 | 1691 | 2695 | 3312 | 3903 | 4471 | 5152 | 5941 | 6617 | 7331 | 8188 | 8861 | 9619 |
| 0217 | 0950 | 1763 | 2717 | 3314 | 3926 | 4484 | 5200 | 5951 | 6630 | 7377 | 8191 | 8874 | 9620 |
| 0240 | 1003 | 1780 | 2722 | 3317 | 3935 | 4496 | 5204 | 5959 | 6650 | 7404 | 8209 | 8882 | 9658 |
| 0273 | 1011 | 1804 | 2724 | 3333 | 3960 | 4524 | 5252 | 5963 | 6653 | 7438 | 8242 | 8888 | 9679 |
| 0310 | 1018 | 1819 | 2727 | 3336 | 3963 | 4540 | 5265 | 5990 | 6666 | 7468 | 8267 | 8894 | 9697 |
| 0328 | 1051 | 1829 | 2742 | 3347 | 3969 | 4548 | 5285 | 5999 | 6668 | 7501 | 8280 | 8918 | 9701 |
| 0335 | 1071 | 1900 | 2747 | 3370 | 3987 | 4570 | 5305 | 6025 | 6671 | 7550 | 8288 | 8981 | 9794 |
| 0336 | 1094 | 1911 | 2791 | 3384 | 4033 | 4571 | 5312 | 6063 | 6674 | 7577 | 8291 | 8985 | 9795 |
| 0340 | 1109 | 1940 | 2815 | 3393 | 4039 | 4576 | 5325 | 6065 | 6678 | 7591 | 8294 | 9003 | 9816 |
| 0349 | 1130 | 1949 | 2816 | 3394 | 4044 | 4585 | 5326 | 6086 | 6681 | 7686 | 8308 | 9067 | 9870 |
| 0358 | 1144 | 1981 | 2824 | 3403 | 4053 | 4604 | 5358 | 6131 | 6684 | 7698 | 8321 | 9099 | 9887 |
| 0376 | 1147 | 1991 | 2837 | 3432 | 4071 | 4610 | 5362 | 6148 | 6686 | 7701 | 8329 | 9129 | 9892 |
| 0383 | 1148 | 2022 | 2862 | 3433 | 4101 | 4681 | 5406 | 6152 | 6687 | 7702 | 8334 | 9187 | 9904 |
| 0442 | 1152 | 2033 | 2902 | 3458 | 4124 | 4683 | 5451 | 6155 | 6696 | 7703 | 8336 | 9228 | 9921 |
| 0445 | 1157 | 2127 | 2919 | 3467 | 4126 | 4690 | 5485 | 6164 | 6698 | 7709 | 8388 | 9245 | 9930 |
| 0470 | 1159 | 2141 | 2925 | 3470 | 4138 | 4710 | 5516 | 6166 | 6708 | 7716 | 8389 | 9248 | 9941 |
| 0482 | 1161 | 2154 | 2948 | 3487 | 4141 | 4713 | 5517 | 6176 | 6733 | 7737 | 8418 | 9259 | 9950 |
| 0512 | 1163 | 2167 | 2949 | 3521 | 4147 | 4722 | 5535 | 6201 | 6814 | 7747 | 8423 | 9286 | 9954 |
| 0520 | 1188 | 2172 | 3030 | 3552 | 4172 | 4744 | 5557 | 6221 | 6828 | 7757 | 8435 | 9296 | 9965 |
| 0522 | 1210 | 2215 | 3041 | 3573 | 4174 | 4749 | 5559 | 6253 | 6881 | 7794 | 8440 | 9309 | 9968 |
| 0541 | 1211 | 2223 | 3063 | 3618 | 4204 | 4758 | 5560 | 6281 | 6908 | 7799 | 8472 | 9329 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 17 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 23/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-03 : 9323**

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **0500**

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **2490**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1736 | 1924 | 2185 | 2946 | 3598 | 3874 | 5153 | 7836 | 9913 | 9914 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1045 | 2169 | 2499 | 4738 | 4865 | 6308 | 6636 | 6881 | 8430 | 9654 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0680 | 1265 | 2529 | 2955 | 4630 | 5061 | 5984 | 7546 | 8889 | 9948 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1570 | 2366 | 3243 | 4248 | 5435 | 6360 | 7478 | 8502 | 9055 |
| | | 1582 | 2415 | 3261 | 4363 | 5504 | 6380 | 7492 | 8543 | 9126 |
| | | 1631 | 2512 | 3273 | 4364 | 5509 | 6404 | 7535 | 8572 | 9149 |
| 0000 | 0757 | 1743 | 2555 | 3342 | 4378 | 5515 | 6444 | 7549 | 8587 | 9166 |
| 0051 | 0800 | 1808 | 2582 | 3484 | 4394 | 5520 | 6517 | 7674 | 8618 | 9170 |
| 0063 | 0867 | 1857 | 2621 | 3503 | 4457 | 5618 | 6534 | 7710 | 8631 | 9219 |
| 0072 | 0880 | 1861 | 2633 | 3514 | 4464 | 5654 | 6607 | 7711 | 8687 | 9264 |
| 0075 | 0900 | 1862 | 2652 | 3529 | 4466 | 5655 | 6660 | 7714 | 8688 | 9289 |
| 0108 | 0907 | 1871 | 2727 | 3533 | 4492 | 5660 | 6676 | 7717 | 8704 | 9345 |
| 0141 | 0950 | 2012 | 2782 | 3539 | 4501 | 5663 | 6736 | 7744 | 8725 | 9389 |
| 0209 | 0997 | 2057 | 2792 | 3573 | 4604 | 5742 | 6766 | 7897 | 8736 | 9397 |
| 0235 | 1021 | 2068 | 2820 | 3680 | 4607 | 5929 | 6814 | 7951 | 8757 | 9514 |
| 0260 | 1041 | 2084 | 2846 | 3713 | 4615 | 5956 | 6965 | 7971 | 8786 | 9585 |
| 0322 | 1102 | 2223 | 2882 | 3834 | 4710 | 5966 | 6974 | 7977 | 8792 | 9590 |
| 0361 | 1133 | 2228 | 2967 | 3901 | 4742 | 6031 | 7134 | 7979 | 8804 | 9638 |
| 0375 | 1145 | 2244 | 3135 | 4007 | 4744 | 6080 | 7151 | 7987 | 8844 | 9659 |
| 0430 | 1198 | 2250 | 3186 | 4106 | 4791 | 6124 | 7177 | 8063 | 8848 | 9736 |
| 0473 | 1452 | 2328 | 3207 | 4146 | 4953 | 6169 | 7208 | 8078 | 8850 | 9856 |
| 0526 | 1461 | 2329 | 3228 | 4192 | 5075 | 6284 | 7222 | 8216 | 8865 | 9987 |
| 0594 | 1516 | 2332 | 3229 | 4195 | 5079 | 6308 | 7246 | 8322 | 8868 | 9993 |
| 0731 | 1556 | 2346 | 3240 | 4232 | 5253 | 6314 | 7434 | 8358 | 8928 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • दीपलक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 17 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 23/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SD-01 : 8186** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0895 | 1474 | 2907 | 5680 | 5899 | 6859 | 7920 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 8806 प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण | 9666 | 9918 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0230 | 0663 | 0769 | 2247 | 2721 | 2946 | 3119 | 3898 | 7501 | 9113 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0131 | 0760 | 1619 | 1898 | 3545 | 4520 | 4872 | 4951 | 9087 | 9172 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0801 | 2201 | 2677 | 3345 | 4727 | 6308 | 7539 | 8818 |
| | 1125 | 2205 | 2702 | 3458 | 4792 | 6364 | 7638 | 8823 |
| 0003 | 1211 | 2231 | 2752 | 3537 | 5150 | 6385 | 7647 | 8960 |
| 0109 | 1222 | 2257 | 2760 | 3544 | 5188 | 6436 | 7673 | 8988 |
| 0177 | 1313 | 2263 | 2779 | 3632 | 5297 | 6648 | 8047 | 9104 |
| 0196 | 1321 | 2278 | 2794 | 3835 | 5746 | 6699 | 8109 | 9291 |
| 0243 | 1495 | 2321 | 2824 | 3931 | 5788 | 6726 | 8172 | 9477 |
| 0260 | 1714 | 2488 | 2885 | 4018 | 5849 | 6952 | 8361 | 9619 |
| 0523 | 1762 | 2492 | 3089 | 4024 | 5882 | 7077 | 8387 | 9850 |
| 0529 | 1892 | 2572 | 3233 | 4451 | 6009 | 7107 | 8490 | 9853 |
| 0567 | 1941 | 2575 | 3256 | 4472 | 6133 | 7332 | 8510 | 9940 |
| 0743 | 2103 | 2647 | 3314 | 4497 | 6256 | 7359 | 8531 | 9949 |
| 0772 | 2112 | 2648 | 3316 | 4644 | 6305 | 7511 | 8775 | 9956 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 17 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 23/04/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-01 : 0526**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0634 | 0731 | 1768 | 2991 | 4618 प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण | 4853 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 5603 | 6711 | 7286 | 9433 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0738 | 1479 | 1785 | 1904 | 3685 | 4248 | 4671 | 6395 | 7374 | 8864 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0018 | 0236 | 1593 | 1866 | 4747 | 4796 | 7327 | 8434 | 8594 | 8942 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0208 | 0515 | 1323 | 3535 | 5279 | 6466 | 6474 | 6797 | 7825 | 8210 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1813 | 2370 | 3306 | 4257 | 5045 | 5606 | 6607 | 7510 | 8386 | 9154 |
| | | 1852 | 2540 | 3323 | 4321 | 5078 | 5613 | 6626 | 7567 | 8405 | 9159 |
| 0031 | 0909 | 1891 | 2586 | 3334 | 4333 | 5079 | 5633 | 6661 | 7578 | 8465 | 9222 |
| 0060 | 0930 | 1920 | 2647 | 3353 | 4354 | 5090 | 5690 | 6696 | 7593 | 8638 | 9229 |
| 0106 | 0960 | 1923 | 2651 | 3357 | 4394 | 5145 | 5707 | 6778 | 7596 | 8649 | 9268 |
| 0129 | 0961 | 1949 | 2695 | 3373 | 4423 | 5172 | 5717 | 6826 | 7607 | 8661 | 9299 |
| 0150 | 0970 | 1987 | 2712 | 3387 | 4428 | 5178 | 5738 | 6856 | 7657 | 8687 | 9330 |
| 0160 | 0979 | 2077 | 2722 | 3503 | 4449 | 5211 | 5805 | 6864 | 7687 | 8704 | 9342 |
| 0295 | 1029 | 2078 | 2750 | 3504 | 4477 | 5258 | 5817 | 6955 | 7708 | 8820 | 9364 |
| 0311 | 1042 | 2113 | 2782 | 3525 | 4484 | 5260 | 5946 | 6993 | 7760 | 8841 | 9369 |
| 0388 | 1068 | 2168 | 2813 | 3530 | 4640 | 5271 | 5949 | 7033 | 7878 | 8863 | 9443 |
| 0391 | 1133 | 2201 | 2856 | 3554 | 4683 | 5273 | 6068 | 7036 | 7947 | 8881 | 9593 |
| 0457 | 1149 | 2206 | 2870 | 3572 | 4697 | 5379 | 6113 | 7048 | 7974 | 8885 | 9630 |
| 0490 | 1211 | 2224 | 2980 | 3630 | 4745 | 5403 | 6133 | 7073 | 8004 | 8899 | 9643 |
| 0500 | 1361 | 2235 | 3129 | 3634 | 4844 | 5421 | 6167 | 7115 | 8021 | 8916 | 9646 |
| 0506 | 1363 | 2243 | 3131 | 3903 | 4852 | 5481 | 6257 | 7172 | 8029 | 8931 | 9722 |
| 0719 | 1421 | 2244 | 3169 | 3908 | 4924 | 5535 | 6268 | 7180 | 8085 | 8940 | 9806 |
| 0761 | 1465 | 2264 | 3225 | 3933 | 4927 | 5550 | 6279 | 7257 | 8181 | 8993 | 9891 |
| 0802 | 1541 | 2279 | 3260 | 4004 | 4938 | 5574 | 6459 | 7295 | 8192 | 9035 | 9896 |
| 0807 | 1570 | 2291 | 3262 | 4116 | 4978 | 5575 | 6592 | 7433 | 8228 | 9112 | 9969 |
| 0830 | 1608 | 2306 | 3290 | 4145 | 4994 | 5581 | 6602 | 7457 | 8258 | 9128 | 9981 |
| 0873 | 1757 | 2325 | 3301 | 4155 | 5002 | 5595 | 6603 | 7477 | 8362 | 9151 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता.२४/४/२०२६

| ० | १ | ६ |
|---|---|---|
| ०३ | १२ | ६२ |
| ०८ | १७ | ६७ |
| १३६ | १२८ | १२३ |
| २८० | ३८० | ३६७ |

# मिरा-भाईंदर पालिका ई-गव्हर्नन्समध्ये तृतीय

■ मिरा-भाईंदर

**मिरा-भाईंदर** महानगरपालिकेने डिजिटल प्रशासनात उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय ई-गव्हर्नन्स स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. 'ई-ऑफिस' प्रणालीच्या



प्रभावी अंमलबजावणीमुळे महानगरपालिकेला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धा २०२५-२६ अंतर्गत तृतीय क्रमांकाचा सन्मान मिळाला आहे.

या स्पर्धेत राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांनी सहभाग घेतला होता. उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मिरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त राधाबिनोद शर्मा आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रणाली व्यवस्थापक राज घरत यांना पुरस्कार प्रदान केला. या सन्मानात सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि चार लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. यामुळे अवघ्या ६० दिवसांत सर्व विभागांमध्ये शंभर टक्के डिजिटल कामकाज सुरू करणारी राज्यातील पहिली पालिका होण्याचा मान मिळवला. या उपक्रमाला राष्ट्रीय माहिती केंद्राचे प्रमाणपत्रही प्राप्त झाले.

# थायलंडमध्ये भारतीय पर्यटकावर वर्णद्वेषी टिप्पणी! व्हिडिओ व्हायरल

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ बँकॉक

**थायलंडमधील** आओ नांग येथे एका भारतीय पर्यटकाला वर्णद्वेषी वागणुकीचा सामना करावा लागला. ट्रॅव्हल व्लॉगर सुमोने प्रसारित केलेल्या व्हिडिओमध्ये रेस्टॉरंटमधील महिला कर्मचारी भारताबद्दल अपमानास्पद वक्तव्य करताना दिसते. या घटनेमुळे संताप व्यक्त केला जात आहे. सुमोने सांगितले की, सकाळी नाश्त्यासाठी एका रेस्टॉरंटमध्ये गेला होता. जेवणानंतर बिलामध्ये काही गोंधळ झाल्याने त्याने संवादासाठी एका महिला कर्मचाऱ्याला बोलावले. पर्यटकाने स्वतःचे राष्ट्रीयत्व भारतीय असल्याचे सांगताच वातावरण बदलले. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने भारताबद्दल अवमानकारक वक्तव्य केले. तसेच भारतीय ग्राहक पैसे देण्यास टाळाटाळ केल्याचा आरोपही झाला. थायलंडमध्ये प्रवासादरम्यान अशा प्रकारचा अनुभव पहिल्यांदाच आला.

# जिल्हा परिषद निवडणुकांसाठी शिंदे शिवसेनेचा 'मास्टर प्लॅन'

■ मुंबई

**राज्यातील** आगामी २० जिल्हा परिषद निवडणुकांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिंदे शिवसेनेने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली असून पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी 'संपर्क मंत्री अभियान' राबवण्याचा मास्टरप्लॅन तयार केला आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता, एकनाथ शिंदे यांनी पक्षाच्या प्रमुख मंत्र्यांकडे २२ जिल्ह्यांची जबाबदारी सोपवली आहे. यात भाजपा आणि राष्ट्रवादीचे प्राबल्य असलेल्या भागातही ताकद वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. भंडारा व गोंदिया जिल्हा परिषदेची मुदत पुढील वर्षी म्हणजे २०२७ मध्ये संपत आहे. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मंगळवारी रात्री उशिरा शिवसेना मंत्र्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक झाली. यामध्ये १२ मंत्र्यांवर २२ जिल्ह्यांची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यामध्ये

## संपर्कमंत्री अभियान राबविणार

गुलाबराव पाटील: जळगाव व नंदुरबार, उदय सामंत: नाशिक व अहमदनगर, योगेश कदम: ठाणे व पालघर, प्रकाश आबिटकर: नांदेड व हिंगोली, भरत गोगावले: बीड, आशिष जयस्वाल: जालना, प्रताप सरनाईक: अमरावती व अकोला, संजय राठोड: यवतमाळ व वाशिम, संजय शिरसाट: भंडारा व गोंदिया,प्रतापराव जाधव: नागपूर व वर्धा, शंभुराज देसाई: गडचिरोली व चंद्रपूर, दादा भुसे: धुळे व बुलडाणा यांचा समावेश आहे.

यावेळी जिल्हा व तालुका स्तरावरील शासकीय समित्यांमध्ये शिवसेनेचे प्रतिनिधित्व वाढवण्याचे,तसेच मित्रपक्ष भाजपा किंवा अजित पवार गटाचे पालकमंत्री असलेल्या ठिकाणीही आक्रमकपणे जागा मिळवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच जिंकण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देऊन, बीएलए प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून संघटनात्मक यंत्रणा सज्ज ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# बदलापूर स्त्रीबीज प्रकरणात ३० डॉक्टरांना पोलिसांची नोटीस

■ बदलापूर

**बदलापूरमधील** स्त्रीबीज प्रकरणात मोठी कारवाई करत मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील तब्बल ३० डॉक्टरांना पोलिसांनी नोटीस बजावली आहे. बदलापूरमधील एका महिलेकडून तब्बल १० ते १२ वेळा स्त्री बीज काढल्याचे तपासात उघड झाले होते. याच अनुषंगाने संबंधित आयव्हीएफ सेंटर चालवणाऱ्या डॉक्टरांवर पोलिसांचा संशय असून चौकशीचा फेरा वाढवण्यात आला आहे. या प्रकरणात आतापर्यंत तीन डॉक्टरांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण आठ जणांना अटक केली आहे. आता तपासाची व्याप्ती वाढवत मुंबई आणि ठाण्यातील ३० डॉक्टरांना पोलिसांनी नोटीस पाठवून त्यांचे जबाब नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरेंकडून भाजपा प्रवेशाच्या चर्चांना पूर्णविराम

■ राहुरी

**राहुरी** विधानसभा पोटनिवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी पक्षांतराच्या चर्चांबाबत भूमिका स्पष्ट केली. यामुळे त्यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला. मागील काही दिवसांपासून त्यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चांना अफवांना जोर आला होता. मात्र मतदानाचा हक्क बजावल्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी या सर्व चर्चा फेटाळून लावल्या.

प्राजक्त तनपुरे यांनी सांगितले की, ते कोणत्याही नव्या पक्षात जाणार नाहीत आणि ते अजूनही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटासोबतच ठामपणे उभे आहेत. राहुरी पोटनिवडणुकीत त्यांनी दूर राहण्याच्या भूमिकेबाबत स्पष्ट सांगितले की, ही निवडणूक केवळ पोटनिवडणूक असल्याने सत्तासमीकरणांवर त्याचा मोठा परिणाम होणार नव्हता. तसेच आमदार कर्डिले यांच्या निधनामुळे या निवडणुकीवर दुःखाची छाया होती. त्यामुळे राजकीय आक्रमकता टाळून सामंजस्याची भूमिका घेतली.




•स•स्ने•ह नि•मं•त्र•ण•

## मुंबई कोकण विभागीय मजूर सहकारी संघ मर्यादित

(नोंदणी क्रमांक : एएएन. / पीआरडी. / एल-२ / २००५ पुणे, दिनांक २३-०३-२००५)

आयोजित

सभासद संस्थांचे भव्य

## प्रशिक्षण शिबीर

शुक्रवार, दि 24 एप्रिल 2026 रोजी, सकाळी 9.30 ते दुपारी 2.30 पर्यंत

उद्घाटक

मा. ना. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले

सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य
तथा पालकमंत्री, लातुर

कार्यक्रमाचे अध्यक्ष

मा. ना. श्री. प्रविणभाऊ दरेकर

अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं-समुह पुनर्विकास प्राधिकरण
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या.,पुणे
अध्यक्ष, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., मुंबई

प्रमुख पाहुणे

मा. श्रीमती रितुजी तावडे
महापौर, मुंबई महानगर पालिका

मा. श्री. संजय घाडी
उपमहापौर, मुंबई महानगर पालिका

आयोजक

सुनिल बांबुलकर
अध्यक्ष

सुहास गमरे
उपाध्यक्ष

लक्ष्मण आंगणे
सचिव

प्रभु बिरादार, अनिल गडकर, दादासाहेब इंगळे, दिनकर मोहिते
शशिकांत पाध्ये, श्रीकांत राणे, उमेश वराडे, मोहन अंधेरे
मोहन शेट्टी, श्रीमती रेणुका कांबळे, श्रीमती स्वाती करांडे

स्थळ
कोहिनुर मंगल कार्यालय,
दादर (पूर्व) रेल्वेस्टेशन समोर
दादर (पूर्व),
मुंबई ४०० ०१४




# मुंबई भाजपा युवा मोर्चा सचिवपदी विराज कुलकर्णी यांची नियुक्ती

■ मुंबई



**भाजपा** मुंबई अध्यक्ष ॲड. अमित साटम यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई भाजपा अध्यक्ष दीपक सिंह यांनी जाहीर केलेल्या मुंबई भाजपा युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांच्या यादीत सचिव म्हणून समावेश असलेले विराज मुकुंद कुलकर्णी हे अत्यंत नम्र, सौजन्यशील, सुशिक्षित, मनमिळाऊ आणि मृदुभाषी आहेत.

भाजपा नेते हरिनाथा तिवारी, अर्जुन गुप्ता, बाळगोविंद तिवारी, रणजीत सिंह, ठाकूर नरेंद्र सिंह, राधेश्याम यादव, लल्लू सिंह, संदीप गुप्ता आणि इतर भाजपा अधिकाऱ्यांनी सचिवपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विशेष म्हणजे, विराज कुलकर्णी हे भारतीय जनता पक्षाचे राज्य कार्यालय मंत्री मुकुंद कुलकर्णी यांचे सुपुत्र आहेत.

# राणी बागेत लवकरच घुमणार गुजरातच्या सिंहांची गर्जना

■ मुंबई

**दक्षिण** मुंबईतील भायखळा येथील राणी बाग अर्थात वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालयात आता लवकरच सिंहांची गर्जना घुमणार आहे. गुजरातच्या जुनागड येथील सक्करबाग प्राणीसंग्रहालयातील सिंहांची जोडी राणी बागेत दाखल होणार आहे. त्यासाठी मुंबईच्या महापौर रितू तावडे या लवकरच गुजरातला जाणार आहेत. महापौर तावडे यांनीच ही माहिती दिली.

सिंहाची जोडी मिळावी, यासाठी महापौर तावडे या गुजरातचे मुख्यमंत्री आणि वनमंत्र्यांची भेट घेणार आहेत. महापौर तावडे यांनी सांगितले की, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र सिंह यांना २६ मार्चला यासंदर्भात

## महापौर रितू तावडे गुजरातला जाणार



पत्र पाठवले आहे. परंतु त्यांनी हवा तसा प्रतिसाद दिला आहे. आता मी स्वतः मे महिन्यात गुजरातला जाणार आहे. तसेच सक्करबाग प्राणीसंग्रहालयाची पाहणी करणार आहे. वास्तविक, सक्करबाग प्राणीसंग्रहालयाने सिंहांची जोडी देण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेतली आहे. मात्र, सक्करबाग प्राणीसंग्रहालयाने राणी बाग प्राणीसंग्रहालयाकडे झेब्रा मिळावा, अशी मागणी केली आहे. मात्र, झेब्रा देणे शक्य होत नसल्याने राणी बागेत देशी विदेशी पशुपक्षी असून ते देण्याची तयारी राणी बाग प्राणीसंग्रहालयाने दर्शवली आहे, असे महापौर रितू तावडे यांनी सांगितले. राणी बागेत जिमी ही शेवटची सिंहीण होती. तिचा २०१४ मध्ये मृत्यू झाला. त्यानंतर सिंह आणण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत.

# म्हाडा पुणे मंडळातर्फे २९५ सदनिकांची ऑनलाईन विक्री

■ मुंबई

**म्हाडाच्या** पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या अखत्यारीतील विविध वसाहतींमधील २९५ सदनिका 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत असून, यासाठी https://bookmyhome.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज नोंदणीची प्रक्रिया ४ मे रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून सुरू होणार आहे.

पुणे मंडळामार्फत २० टक्के सर्वसमावेशक व १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण योजनांतील विक्री अभावी शिल्लक राहिलेल्या २९५ सदनिका 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' योजनेमध्ये समावेश करण्यात आला असून पुणे महानगरपालिका म्हाडा योजनेंतर्गत ११३ सदनिका व पिंपरी चिंचवड म्हाडा योजनेंतर्गत १८२ सदनिकांचा समावेश आहे. योजनेंतील सदनिकांची माहिती व योजनेत सहभागी होण्याकरिताचे मार्गदर्शन करणारी माहिती पुस्तिका https://bookmyhome.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येणार आहे.

# ठाण्यात २७ सरकारी योजनांत घोटाळा अंजली दमानियांची चौकशीची मागणी

■ ठाणे

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात महिला आणि बालविकास विभाग कार्यालयाच्या २७ योजनांमध्ये ठेकेदारांनी ७३ कोटींचा मोठा घोटाळा झाल्याचे उघड झाले आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी चौकशी करण्याची मागणी केली आहे.

त्या म्हणाल्या की, २७ योजनांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ चौकशी करण्याचे आदेश द्यावेत. या योजनांचा काम करणाऱ्या ३ कंपन्यांनी एकाच पत्त्यांवर निविदा भरल्या होत्या. हा घोटाळा ठरवून केलेला आहे. त्या पुढे म्हणाल्या की, २०१९ ते २०२५ मध्ये या योजनांचा घोटाळा झाला आहे. या काळात तीन-तीन सरकार बदलली आणि कोणालाच काहीच वाटले नाही. यात सर्वांची टक्केवारी ठरलेली असते. कोणाचाही मंत्री असेना, त्यांना टक्केवारी पोहोचवली की, सर्व फिक्स होते. त्यामुळेच अधिकारी आणि ठेकेदार घोटाळा करत आहेत. या घोटाळ्याचा हा आकडा फक्त ठाण्यातीलच आहे. या योजनांतून महिलांसाठी जंगलात हिरकणी कक्ष बनवले आहेत. मला ऐकूनच मोठा धक्का बसला. आपल्या कराच्या पैशांचा भ्रष्टाचारी लोक कचरा करत आहेत. फक्त खिसा भरत आहेत.

# मुंबईतील खड्डे भरण्यासाठी पालिका ४२ कोटी खर्च करणार

**मुंबई- यंदा** पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्यात मुंबईतील रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी पालिका प्रशासन सज्ज झाले आहे. त्यासाठी यंदा २ ते ३ हजार मेट्रिक टन मास्टिक डांबरचा वापर करण्यात येणार आहे. शहर व दोन्ही उपनगरातील खड्डे भरण्यासाठी ४२ कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. वास्तविक पालिका प्रशासन दरवर्षी रस्ते खड्डेमुक्त कोट्यवधी रुपये खर्च असते. यंदा ९ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम पावसाळ्यापूर्वी, पावसाळादरम्यान व पावसाळ्यानंतर होणार आहे.रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी सिमेंट काँक्रीटचे रस्ते करण्यावर पालिका प्रशासनाने भर दिला आहे.

# पुनर्विकासावर बोळवण करू नका इतर मागण्यांचा विचार करा

**मोतीलाल नगरवासियांची मागणी**

■ मुंबई

**गोरेगावच्या** मोतीलाल नगरच्या पुनर्विकासावर आमची बोळवण करू नका, रहिवाशांच्या इतरही मागण्यांचा विचार करा. मगच पुनर्विकासाची वीट रचा, अशा आशयाचे निवेदन वजा मागणी येथील तीन समित्यांनी म्हाडाकडे केली आहे.

मोतीलाल नगर जनकल्याणकारी समिती, रहिवासी विकास संघ, पुनर्विकास समन्वय समिती यांनी दिलेल्या माहितीनुसार आम्हाला पुनर्विकास हवा आहे. मात्र म्हाडाने रहिवाशांना दोन लाख रुपये कॉर्पस फंड देऊ केला आहे. हे आम्हाला मान्य नाही. रहिवाशांना २५ लाख रुपये कॉर्पस फंड देण्यात यावा की टू की घरे मुदतीत मिळावीत वीस वर्षांसाठी मेंटेनन्स फ्री करावा. ज्या रहिवाशांची घरे तुटणार आहेत, अशा घरमालकांना किती रुपये घर भाडे दिले जाणार आहे. यासर्व मागण्यांची स्पष्टता म्हाडाने करावी, असा आमचा ठाम निर्धार आहे.





तिकीटांसाठी संपर्क :
ANDHERI: Chintamani Enterprises 99879 73909 BORIVALI: The Diamond Corporation 86574 36773 DADAR: Ambika Agency 99690 24881 R K EnterprisesDadar77158 44353 Shree Enterprises 84258 59588 Shree Ganesh Enterprises 98700 17798 | Shri Siddhi Samarth Enterprises 98331 43143 GHATKOPAR : Shrushti Agency 93239 77979 GIRGAON: Trimurti Lottery Agency 97733 73267 GOREGAON: Jai Jalaram Lotteries 98214 88334 KALBADEVI: Mewad Agency 98332 53514 | Prince Agency 98337 48152 KALYAN: Prince Lottery 98195 74813 MALAD: Samarth Enterprises 93265 35534 MASJID BUNDER: New Chheda Lottery Center 97736 01601 MULUND: Mohanlal Pyarelal Jaiswal 98191 61758 NERUL: Shree Ganesh Kripa Agency 99301 85874 PANVEL: Phatak Enterprises 91675 52882 THANE: B V Ganatra Huf 90827 02476 | Pawar Lottery Center 98922 49002 VILE PARLE: Adarsh Communication 97731 85094

सब - डिस्ट्रीब्युटर: सेरेनिटी ट्रेडस प्रा. लि. 022 - 6835 1555


# ठाण्यात वर्तुळाकार मेट्रो ऐवजी इलेक्ट्रिक बसेस खरेदी करा!

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची मागणी

■ ठाणे

**शहरामध्ये** सुमारे साडेबारा हजार कोटी रुपये खर्चुन उभारल्या जाणाऱ्या वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पाला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने विरोध केला आहे. या प्रकल्पाऐवजी टीएमटीसाठी इलेक्ट्रिक बसेस खरेदी कराव्या, अशी मागणी पक्षाचे शहराध्यक्ष मनोज प्रधान यांनी केली आहे.

मनोज प्रधान यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करून ठाण्यातील वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, हा प्रकल्प शहरातील बॅरिस्टर नाथ पै मार्ग, हिरानंदानी इस्टेट आणि



बाळकूममार्गे ठाणे रेल्वे स्थानकाला जोडणार आहे. सुमारे साडेबारा हजार कोटी रुपये खर्चुन हा प्रकल्प राबवला जाणार आहे. मात्र, या प्रकल्पाऐवजी परिवहन व्यवस्थेसाठी निधी दिल्यास इलेक्ट्रिक बसेस उपलब्ध होऊन शहरातील वाहतूककोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, मी स्वतः बॅरिस्टर नाथ पै मार्गावरून प्रवास करतो. त्या मार्गावरून घरी पोहोचण्यासाठी किमान तीन सिग्नल पार करावे लागतात. इतकी प्रचंड वाहतूक कोंडी होत असते. तसेच या वर्तुळाकार रेल्वे प्रकल्पासाठी सुमारे तीन हजार झाडे तोडण्यास पालिकेने परवानगी दिली आहे. ज्या कारणांसाठी आपण ठाण्यात राहायला आलो, चांगली हवा आणि हिरवळ तेच घटक आता धोक्यात आले आहेत.

# कर्नाटकात निकालातून मराठी गायब सीमाभागात भाषावाद पुन्हा पेटला

■ बंगळुरू

**कर्नाटक** राज्यातील सीमा भागात दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निकालपत्रातून मराठी हा शब्द वगळल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. भाषेच्या रकान्यात मराठी नोंदवण्याऐवजी तो कोरा ठेवून केवळ गुण नमूद करण्यात आल्याने मराठी भाषिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

सीमाभागातील मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या निकालपत्रांमध्ये हा प्रकार आढळल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कर्नाटक सरकारचा मराठी भाषेबाबतचा आकस पुन्हा एकदा समोर आल्याची टीका होत आहे. मराठी भाषेचे अस्तित्व नाकारण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. शैक्षणिक दाखल्यांवरून मराठीचा उल्लेख हटवणे हे केवळ प्रशासकीय त्रुटी नसून जाणीवपूर्वक केलेले पाऊल असल्याचे मराठी संघटनांचे म्हणणे आहे. या घटनेनंतर सीमाभागातील मराठी संघटना आक्रमक झाल्या असून, त्यांनी या निर्णयाचा निषेध नोंदवला आहे. कितीही प्रयत्न केले तरी मराठी भाषा आणि संस्कृती पुसता येणार नाही असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# राज्य सहकारी बँकेला समाजाभिमुख धोरणांमुळे ७०२ कोटींचा नफा

■ मुंबई

**सामाजिक** बांधिलकी, पारदर्शक कारभार आणि समाजाभिमुख धोरणांचा संगम साधत राज्य सहकारी बँकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये तब्बल ७०२ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे. आर्थिक प्रगतीसोबत शेतकरी, ग्राहक आणि माजी कर्मचाऱ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत बँकेने यशाची नवी उंची गाठली आहे.

मार्च २०२६ मध्ये रोखे बाजारातील घसरणीमुळे आवश्यक आर्थिक तरतुदी कराव्या लागल्याने राज्य सहकारी बँकेच्या नफ्यावर परिणाम झाला, अन्यथा नफा सुमारे ९१० कोटी रुपयांपर्यंत गेला असता. तरीही बँकेने सामाजिक उत्तरदायित्व जपत शेतकऱ्यांसाठी १० कोटी रुपयांची मदत, माजी कर्मचाऱ्यांसाठी निवृत्ती वेतन व आरोग्य योजना सुरू केल्या. तसेच ग्राहक सुरक्षेसाठी वाशी येथे अत्याधुनिक 'सहकार सुरक्षा' केंद्र उभारले आहे. राज्य सहकारी बँकेने २०२२ पासून सलग प्रत्येक वर्षी ६०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निव्वळ नफा नोंदवला. त्यामुळे आर्थिक शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि सहकार मूल्यांचा संगम साधणारी ही संस्था म्हणून बँकेकडे पाहिले जात आहे.

# मुंबई आणि नाशिक ड्रगची राजधानी कशी झाली? खा. राऊत यांचा सवाल

■ मुंबई

**मुंबईसह** महाराष्ट्रात इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग कुठून येत आहे? मुंबई, नाशिक ड्रगची राजधानी का होताना दिसून येत आहे? पुणे, नागपूरमध्ये ड्रग का सापडत आहेत? दरे गावाजवळ ड्रगचा कारखाना कुणी सुरू केला? यावर राज्याच्या गृहमंत्र्यांनी बोलले पाहिजे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.



राऊत पुढे म्हणाले की, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू यासारख्या राज्याच्या निवडणुकीत संविधान आणि लोकशाहीची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. भाजपा त्यांचे मंत्री आणि निवडणूक आयोगाने ज्या प्रकारे यंत्रणेचा वापर करत ममता बॅनर्जी यांची कोंडी करण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्याचा धिक्कार करावा तेवढा कमीच आहे. तरीही मला खात्री आहे की, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी चांगल्या बहुमताने सत्तेवर येतील. जनतेच्या हक्काच्या रक्षणासाठी आणि संविधानासाठी ही निवडणूक फार महत्त्वाची असणार आहे.

# प. बंगाल, तामिळनाडूत विक्रमी मतदान

पान १ वरून

ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. बंगालमधील इतर अनेक ठिकाणी भाजपा आणि तृणमूल कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. अनेक ठिकाणी ईव्हीएम बिघाड झाल्याच्या तक्रारीही समोर आल्या. लोकांनी निवडणूक अधिकाऱ्यांना घेराव घालत आक्षेप नोंदवला. मुर्शिदाबादच्या नौदा येथे मतदानापूर्वी काल उशिरा रात्री सुतळी बॉम्ब फेकण्यात आला होता. यात अनेक जण जखमी झाले. त्यानंतर आम जनता उन्नयन पार्टीचे प्रमुख हुमायूं कबीर आज सकाळी घटनास्थळी पोहोचले असता तृणमूल कार्यकर्त्यांसोबत त्यांची झटापट झाली. सिलीगुडीमध्येही मतदानादरम्यान भाजपा आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाली. तामिळनाडूत पीएमकेचे नेते अणबुमणी यांनी आज दावा केला की, मोठ्या प्रमाणात झालेले मतदान हे सत्तांतराचे निदर्शक असून अण्णा द्रमुक नेतृत्वाखालील एनडीएचा विजय निश्चित आहे.

# भाईंदरचे क्रीडा संकुल लोकार्पणानंतरही बंद

■ भाईंदर

**मोठा** गाजावाजा करून सुरू करण्यात आलेले भाईंदरमधील जैनाचार्य सूरिश्वरजी क्रीडा संकुल लोकार्पणानंतरही सुरू झालेले नाही. क्रीडा संकुल चालवण्याचे धोरण अद्याप ठरले नसल्याचे कारण पालिकेने दिले आहे.

शहरातील क्रीडा प्रेमींसाठी मिरा-भाईंदर पालिकेने ४२ कोटी रुपये खर्च करून भाईंदर पश्चिमेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर अत्याधुनिक क्रीडा संकुल आणि सभागृह बांधले आहे. चार मजली क्रीडासंकुलात ग्रंथालय, कॅरम, टेबल टेनिस, जिम, स्क्वॉश कोर्ट, तायक्वांदो कोर्ट तसेच बॉक्सिंग कोर्टाची सुविधा तसेच आधुनिक क्रिकेट टर्फ विकसित करण्यात आले आहे. या क्रीडा संकुलाच्या श्रेयावरून वाद निर्माण झाला होता. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे नाव पत्रिकेतून डावलल्याने त्यांनी बहिष्कार टाकून तक्रारही केली होती. मात्र या क्रीडा संकुलाच्या लोकार्पण सोहळ्याला दहा दिवस उलटूनही ते सुरू झालेले नाही. याबाबत क्रीडा प्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे. क्रीडा संकुलाचे काम पूर्ण झाले आहे. परंतु ते ठेकेदारामार्फत सुरू करण्यासाठी धोरण ठरलेले नाही. ते ठरल्यानंतर क्रीडा संकुल चालविण्याचा ठेका काढून ते खुले केले जाईल, असे कार्यकारी अभियंता दिपक खांबित यांनी सांगितले.

# आईच्या निवडीदिवशीच जय पवार आमदारकीसाठी उतावीळ! २०२९ ला विधानसभा लढणार

पान १ वरून

प्रत्येकाला निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे. २०२९ च्या निवडणुकीला वेळ आहे. तीन-साडेतीन वर्षे आहेत. त्यामुळे आता ही चर्चा करणे योग्य नाही. मात्र त्यानंतर आणखी एक गुगली टाकत युगेंद्र पवार म्हणाले की, २०२९ तोपर्यंत मतदार पुनर्रचना होऊ शकते.

मतदारसंघ वाढू शकतात. बारामतीचे दोन मतदारसंघ होऊ शकतात. त्यांच्या या वक्तव्याने आणखी खळबळ उडाली. त्यांच्या विधानावरून लक्षात येते की बारामती मतदारसंघाचे दोन मतदारसंघ होणार आहेत, एका मतदारसंघातून सुनेत्रा पवार तर दुसऱ्या मतदारसंघातून जय पवार निवडणूक लढणार हे पवार कुटुंबाचे ठरले आहे. यातूनच जय पवार यांनी आमदारकीची इच्छा व्यक्त केली. पवार कुटुंबाचे सत्तेसाठीचे राजकारण सतत सुरू असते.

तर युगेंद्र पवार यांचे वडील श्रीनिवास पवार यांनी म्हटले की, मी जय आणि रोहित दोघांचेही वक्तव्य ऐकलेले नाही. दोघेही तरुण आहेत, त्यामुळे प्रत्येकाची वेगवेगळी मते आहेत. जयची निवडणूक लढवायची इच्छा आहे. दादा म्हणायचे की याच्यामध्ये पडू नको. पण लोकांचे बघून बघून त्याची इच्छा तयार झाली असेल. त्याच्यात काही चूक नाही. तो दादांचा मुलगा आहे, बहुतेक २०२९ मध्ये वहिनी माघार घेतील आणि जय निवडणूक लढवेल, असे दिसते आहे. जय यांच्या वक्तव्यांवरून चर्चा सुरू झाल्यावर जयने पत्रकार परिषद घेऊन सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले की, कुटुंब म्हणून आम्ही एकत्र आलो आहोत. माझी युगेंद्रशीही चर्चा झाली. आपण एकत्र राहिले पाहिजे, अशी त्याचीही इच्छा आहे. पवार विरुद्ध पवार लढत व्हावी, अशी कुणाचीही इच्छा नाही.

# सप्तश्रृंगगडावर २२ किलो चांदीचा घोटाळा! सखोल चौकशीचे आदेश

■ वणी

**महाराष्ट्रातील** साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या वणीच्या सप्तश्रृंगगडावरील मंदिरात नक्षीकामासाठी वापरल्या जाणाऱ्या चांदीत तब्बल २२ किलो ४९० ग्रॅमची तफावत आढळल्याने खळबळ उडाली आहे. सामाजिक कार्यकर्ते विठोबा द्यानद्यान यांनी या प्रकरणाची तक्रार केल्यानंतर विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयाने या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यानंतर प्रशासनाकडून तपास सुरू केला. मंदिरातील जुन्या नोंदीनुसार सुमारे ४०६ किलो चांदी असणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्ष मोजणीत केवळ ३८३ किलो ७०३ ग्रॅम चांदी आढळल्याने मोठी तफावत उघड झाली. या प्रकारामुळे मंदिर ट्रस्टच्या कारभारावर संशय व्यक्त केला जात आहे.

# सातार्‍यात ट्रक कालव्यात कोसळला! चालक जखमी

■ सातारा

**सातार्‍यातील** वाढे गावच्या हद्दीत एक ट्रक थेट कालव्यात कोसळला. अपघातात चालक जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर स्थानिक प्रशासन आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले आणि क्रेनच्या साहाय्याने ट्रक कालव्यातून बाहेर काढला. या अपघातामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. सुदैवाने मोठी दुर्घटना टळल्याने स्थानिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# उद्योगपतीच्या पत्नीची आत्महत्या

■ सुरत

**सुरतमध्ये** एका प्रतिष्ठित उद्योगपतीची पत्नी ख्याति केजरीवाल हिने २१ एप्रिल रोजी सुभाषनगर येथील तिच्या बंगल्यात आत्महत्या केली. विवाहानंतर अवघ्या दोन महिन्यांत तिने टोकाचे पाऊल उचलले. या घटनेमुळे सुरतच्या व्यावसायिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवविवाहित ख्याति तिच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावरील बेडरूममध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली.

## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-Tender Notice (RFx No. 7000039627)

MSETCL invites digitally signed online bids for following tender through SRM E-tender process of MSETCL in two bid system from registered contractors, agencies on Mahatransco E-Tendering website **http://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | Tender No & Description of Work | Due date & Time (Hrs.) for submission & opening of Tender |
|---|---|---|
| 1 | **Tender No. CELDK/SCADA/2026/ITOTLAB/4** | |
| | **Scope of Work :** Supply, Installation, Configuration, Testing and Commissioning of High-End servers for IT-OT Test Lab at MSLDC, Airoli & ALDC, Ambazari with Comprehensive Onsite warranty for the period of 5 (Five) Years. | **Download of Tender Documents Date: From 24.04.2026 to 08.05.2026 Hrs 23:59** |

| Estimated Cost (Rs.) | EMD (Rs.) | Tender Fee (Rs) +GST@18% Extra | Closing Date (Submission) | Tender (Technical) Opening dt. | Commercial opening date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. 70,59,830/- | Rs. 70,598/- | 590/- (500 + 90 18% GST) | 08.05.2026 Up to 23:59 Hrs | 11.05.2026 11.00 AM (If possible) | 13.05.2026 11.00 AM (If possible) |

**Contact Person:** Executive Engineer (SCADA)/ Dy. Executive Engineer (SCADA)/ Assistant Engineer (SCADA) Maharashtra State Load Dispatch Centre, Thane-Belapur Road. At & Post Airoli Navi Mumbai - 400708. Tel. no. 9769213859/8879756261/8087070878

For further details visit our website **http://mahatransco.in/** or **http://srmetender.mahatransco.in**

**Note :-** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal **http://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Superintending Engineer (SCADA/Admin) (MSLDC) MSETCL, Airoli.**

।। अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।

## खोपोली नगरपरिषद, खोपोली

KMC

ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१०२०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, फॅक्सः- ०२१९२-२६४२११
E mail ID:-cokmckhopoli@gmaiJ.com

### विभाग:- पाणीपुरवठा
### जाहीर निविदा सुचना

मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद खोपोली हे खालील कामाची जाहीर निविदा द्विलिफाफा पद्धतीने अर्हताधारक अभिकारक यांसकडून विहित नमुन्यात दि. ०८/०५/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत मागवित आहेत. याकामी कोरे निविदा फॉर्म मिळणेकामी नगरपरिषदेच्या नागरी सुविधा केंद्रात मागणी अर्ज दि. ०८/०५/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत करावेत. तसेच, दि. ०८/०५/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत याकामी आवश्यक निविदा फॉर्म शुल्क व निविदा अनामत रक्कम भरणा करावी. सीलबंद निविदा द्विलिफाफा पद्धतीने दि. ०८/०५/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत पाणीपुरवठा विभागात जमा कराव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म शुल्क (रु) | निविदा अनामत रक्कम (रु.) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | खोपोली नगरपरिषदेस आवश्यकतेप्रमाणे पिण्याच्या पाण्याचे टॅंकर भाडेतत्वावर पुरविणे. | २०००/- | १०,००० /- | ३६५ दिवस |

विहित मुदतीत प्राप्त निविदा दि. ११/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. सदर निविदेची संपूर्ण माहिती व आवश्यक कागदपत्र नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागात कार्यालयीन वेळेत मिळतील. तरी, इच्छुक अभिकारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घ्यावा.

ठिकाण :- खोपोली नगरपरिषद, खोपोली
दिनांक :- २३/०४/२०२६

सही/-
(अविनाश भोईर)
उप नगर अभियंता
खोपोली नगरपरिषद, खोपोली

जा.क्र.केएमसी/पापु/३२९

## जाहीर सूचना

*(माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ, न्यायालय - I च्या निर्देशांनुसार नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अंतर्गत पारित)*

**श्री. रविंद्र काथोर पाटील (आरके पाटील इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) च्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी श्री. रविंद्र काथोर पाटील यांच्याकरिता आदेश दिनांक २१ एप्रिल, २०२६ द्वारे नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६च्या कलम १०० अन्वये दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
श्री. रविंद्र काथोर पाटील यांच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १५ मे, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी निम्नस्वाक्षरीकार ठराव व्यावसायिकाकडे सादर करण्याकरिता आमंत्रित करण्यात येत आहे. दावे इलेक्ट्रॉनिक माध्यमे, नोंदणीकृत टपाल, स्पीड पोस्ट किंवा कुरियरद्वारे सादर करता येतील.
कृपया नोंद घ्यावी: दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | ऋणको/वैयक्तिक जामीनदाराचे नाव | श्री. रविंद्र काथोर पाटील |
| २ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | मुक्काम पो. वहाळ, घर क्र. ६६ ए, हनुमान मंदिराजवळ, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ |
| ३ | निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्याच्या आदेशाचे तपशील | **सी.पी(आयबी) क्र. ११७७/एमबी/२०२५** आदेश दिनांक २१.०४.२०२६ |
| ४ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक | २१.०४.२०२६ |
| ५ | दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | राजेश शाह IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881 |
| ६ | ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल (नोंदणीकृत) | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता पत्ता आणि ई-मेल | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १५.०५.२०२६ |
| ९ | संबंधित अर्ज : | पीजी ते सीडी विनियमनांअंतर्गत "फॉर्म बी" वेब लिंक: https://www.ibbi.gov.in/home/downloads |

राजेश शाह
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881
एएफए वैधता ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत
दिनांक: २४.०४.२०२६
ठिकाण: पुणे

## जाहीर सूचना

*(माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ, न्यायालय - I च्या निर्देशांनुसार नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अंतर्गत पारित)*

**सौ. पार्वती रविंद्र पाटील (आरके पाटील इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) च्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी सौ. पार्वती रविंद्र पाटील यांच्याकरिता आदेश **दिनांक २१ एप्रिल, २०२६** द्वारे नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६च्या कलम १०० अन्वये दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
सौ. पार्वती रविंद्र पाटील यांच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. १५ मे, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी निम्नस्वाक्षरीकार ठराव व्यावसायिकाकडे सादर करण्याकरिता आमंत्रित करण्यात येत आहे. दावे इलेक्ट्रॉनिक माध्यमे, नोंदणीकृत टपाल, स्पीड पोस्ट किंवा कुरियरद्वारे सादर करता येतील.
**कृपया नोंद घ्यावी:** दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | ऋणको/वैयक्तिक जामीनदाराचे नाव | सौ. पार्वती रविंद्र पाटील |
| २ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | मुक्काम पो. वहाळ, घर क्र. ६६ ए, हनुमान मंदिराजवळ, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ |
| ३ | निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्याच्या आदेशाचे तपशील | **सी.पी(आयबी) क्र. १२१५/एमबी/२०२५** आदेश दिनांक २१.०४.२०२६ |
| ४ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक | २१.०४.२०२६ |
| ५ | दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | राजेश शाह IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881 |
| ६ | ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल (नोंदणीकृत) | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता पत्ता आणि ई-मेल | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १५.०५.२०२६ |
| ९ | संबंधित अर्ज : | पीजी ते सीडी विनियमनांअंतर्गत "फॉर्म बी" वेब लिंक: https://www.ibbi.gov.in/home/downloads |

राजेश शाह
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881
एएफए वैधता ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत
दिनांक: २४.०४.२०२६
ठिकाण: पुणे

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)

### ई-निविदा सूचना
ई-निविदा क्र. का.अ./फ-द/मुं.इ.दु.व पु.मं./०५/२०२६

**Main Portal : https://mahatenders.gov.in**
**MHADA Portal : https://mhada.gov.in**

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, सनशाईन प्लाझा, २ रा मजला, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर (पुर्व), मुंबई - ४०००१४ यांचेकडे **मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registrar** यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या पात्र मजूर सहकारी संस्थाकडून एकूण **१५** कामाकरीता बी-१ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | निविदा विक्री सुरू | २७/०४/२०२६ सकाळी १०.१० | २. | निविदा विक्री बंद | ०४/०५/२०२६ सायंकाळी ४.०० |
| ३. | तांत्रिक बोली उघडणे | ०५/०५/२०२६ सायंकाळी ४.०० | ४. | आर्थिक बोली उघडणे | ०६/०५/२०२६ सायंकाळी ४.०० |

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. सशर्त ऑफर्स स्विकारल्या जाणार नाहीत.

**टीप :** १. कृपया वेबसाईटवर निविदा सूचना पहा.
२. शुध्दीपत्रक/ दुरुस्ती जर काही असेल तर ती फक्त वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येईल.

सही/-
**कार्यकारी अभियंता / फ (दक्षिण) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**

CPRO/A/330
Follow us: @mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई (म्हाडाचा घटक)
उपमुख्य अधिकारी / पुगा, गृहनिर्माण भवन, कक्ष क्र. ३७२, दुसरा मजला, कलानगर, वांद्रे (पु), मुंबई - ५१

### जाहिरात

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकर प्राप्त इमारतीमधील ज्या भाडेकरु/ रहिवाशी यांना निष्कासन सूचना (व्हेकेशन नोटीस) देऊन इमारत खाली करण्यात आलेली आहे व त्यांच्या मूळ इमारतीचा अरुंद भूखंड, आरक्षण, रस्ता रुंदीकरण इत्यादी कारणामुळे पुनर्विकास शक्य नाही. तसेच उपकरप्राप्त इमारती पुनर्रचित झालेल्या आहेत, परंतु कमी गाळे बांधले गेले आहेत अशा वंचित मुळ भाडेकरु/ रहिवाशी यांना यापूर्वी मंडळाद्वारे पुनर्रचित/ पुनर्विकसित इमारतीमध्ये कायमस्वरुपी गाळा देण्यात आलेला नाही व त्यांचे वारसदार संक्रमण शिबीरात स्वतः अधिवास धारण करीत आहेत. अशा खऱ्या खुऱ्या मूळ भाडेकरु / रहिवाशी अथवा त्यांचे वारसदार यांचेकडून **दि. ०१/०५/२०२६ सकाळी १०.०० वाजता पासून ते दि. २०/०५/२०२६ रात्री ११.५९ पर्यंत** बृहतसूचीवरुन पात्रता निश्चित करुन गाळे वितरणासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जदाराची नोंदणी व ऑनलाईन अर्ज भरण्याची पध्दत म्हाडा संकेतस्थळ **masterlist.mhada.gov.in** वर उपलब्ध आहे.

**ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दत खालील प्रमाणे.**

Step- १. सर्वप्रथम अर्जदार यांनी म्हाडा संकेतस्थळ www.mhada.gov.in वर citizen corner मध्ये जाऊन Application for Masterlist वर Click करुन नोंदणी (Registration) करावे.

**अथवा**

**masterlist.mhada.gov.in** या संकेतस्थळावर जावून Registration करावे.

Step -२. Login करण्यासाठी नोंदणी (Registration) करताना वापरलेल्या e-mail ID व पासवर्ड (Password) ने Login करावे.
सदर e-mail ID व पासवर्ड (Password) जतन करुन ठेवावा.

Step -३. Login केल्यानंतर आपणांस अर्ज करण्याच्या सुचना व पध्दती (Guidelines / User Manual) दिसून येईल. त्यानुसार आपणांस अर्ज करणे सोपे होईल.

**सूचना :-**
१) नोंदणी (Registration) करताना अर्जदाराचा वैध मोबाईल नंबर आणि ई-मेल पत्ता असणे आवश्यक आहे.
२) अर्ज भरण्याच्यावेळी अर्जदाराकडे खालील कागदपत्रांच्या Scanned Copy असणे आवश्यक आहे.
i) अर्जदाराचा रंगीत फोटो. (jpg format)
ii) अर्जदाराच्या हस्ताक्षर किंवा अंगठयाचा ठसा आदीचा फोटो (jpg format)
iii) आधार कार्ड (pdf Format)
iv) व्हेकेशन नोटीस, जुन्या इमारतीतील गाळ्यांची भाडेपावती, विद्युत देयक, संक्रमण शिबीरातील गाळ्याचे वितरण आदेश व ताबा पावती (pdf Format)
v) हस्तांतरण करारनामा (Transfer Agreement) (pdf Format)

टीप :-
१. ज्यांना यापूर्वी बृहतसूची समितीने पात्र घोषित केलेले आहे अशा व्यक्तींनी नव्याने अर्ज दाखल करु नये तसेच ज्या अर्जदारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल केला आहे अशा अर्जदारांनी पुनश्च नव्याने अर्ज दाखल करु नये.
२. तथापि, ज्यांनी यापुर्वी बृहतसुचीकरीता ऑफलाईन पध्दतीने अर्ज केलेला आहे परंतु त्यांचे प्रकरण अद्याप प्रलंबित आहे अशा व्यक्तीनी नव्याने ऑनलाईन अर्ज दाखल करावा.
३. अर्ज यशस्वीरित्या Submit केल्यानंतर, अर्जदाराने स्वतः प्रमाणित केलेले, अर्जासोबत ऑनलाईन दाखल केलेले कागदपत्र ३० दिवसांच्या कालावधीत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर जमा करावीत.
**पत्ता :- खोली क्र. ३७२, दुसरा मजला, म्हाडा गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा पुर्व, मुंबई - ५१.**
४. सुनावणीच्या वेळेस अर्जदाराने सर्व Upload केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती व त्यासंबंधीत कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक आहे.

अर्जदाराची पात्रता व पुनर्रचित/ पुनर्विकसित गाळ्याचे वितरण याबाबत म्हाडा अधिनियम १९७६ व विनियम १९८१ तसेच शासनाचे व म्हाडाचे नूतन धोरणातील तरतुदीमधील धोरणानुसार गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल.

**मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मान्यतेने**

सही/-
उपमुख्य अधिकारी / पु.गा.
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

CPRO/A/335
Follow us: @mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, सौ. अफ्रोझ आर पटेल उर्फ अफ्रोझरा मोहम्मद अस्लम इब्राहिम आणि श्री. मुनाफ मोहमद अस्लम हे ३०वा रस्ता, पाली रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०० ०५० येथे स्थित महेश मिलन आता "ज्वेल मिलन" असे ओळखली जाणारी इमारत ("सदर इमारत") मधील ४ थ्या मजल्यावरील सदनिका क्र. ४०१, मोजमाप ७६.९२ चौ.मी. बिल्ट अप ("सदर सदनिका/युनिट")चे संपूर्ण मालक आहेत.

ज्याअर्थी विक्री करारपत्र दिनांक २२ एप्रिल, १९८८ नुसार, सौ. अफ्रोझ आर पटेल यांनी सदर सदनिका/युनिट क्र. ४०१ मे. महेश बिल्डर्स कडून खरेदी केली होती, जी हमीचे उप-निबंधक, अंधेरी-एमएसडी (वांद्रे) यांच्यासमक्ष नोंद. क्र. बीडीआर-१-१९९६ नुसार पुष्टी करारनामा दिनांक १२ मार्च, १९९६ द्वारे योग्यरित्या निर्णयित आणि नोंदणीकृत करण्यात आली. नोंदणीकृत भेट करारनामा दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ नुसार, सौ. अफ्रोझ आर पटेल उर्फ अफ्रोझरा मोहम्मद अस्लम इब्राहिम यांनी त्यांचे ५०% हक्क, शीर्षक आणि हिस्सा हमीचे उप-निबंधक, अंधेरी-१, एमएसडी यांच्यासमक्ष नोंद. क्र. बीडीआर-१-२३३१-२०१८ नुसार तिचा मुलगा, श्री. मुनाफ मोहमद अस्लम यास भेट दिले. मयत सौ. अफ्रोझ आर पटेल उर्फ अफ्रोझरा मोहम्मद अस्लम इब्राहिम यांचे दिनांक १० सप्टेंबर, २०२५ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात श्री. मुनाफ मोहमद अस्लम हा तिच्या पश्चात सदनिका/युनिट क्र. ४०१ च्या संदर्भात तिचा केवळ मुलगा आणि लाभार्थी आणि मालक आहे.

कोणी व्यक्ती/पक्ष, न्यायिक, अर्ध-न्यायिक अधिकारी, वित्तीय संस्था, बँक यांचा **वरील उल्लेखित सदर सदनिका, समभाग, मालकी किंवा शीर्षक करारनामाच्या संदर्भात अन्य कोणत्याही प्रकारचा किंवा कोणत्याही स्वरुपाचा आक्षेप आणि सदर मालमत्तेच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचे कोणताही इतर प्रकारचे दावे** असल्यास, त्यांनी त्याबाबत निम्नस्वाक्षरीकार यांना खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून **पंधरा दिवसांमध्ये** कळवावी, असे न केल्यास असा कोणताही दावा, सोडून दिला आणि/किंवा त्याग केला असे समजण्यात येईल आणि त्यानंतर कोणतीही तक्रार/आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही आणि तो रद्दबातल मानला जाईल.

**दिनांक २४ एप्रिल, २०२६**
**सही/-**
**श्री. सुरेश आर. सावंत**
**ॲडव्होकेट उच्च न्यायालय, मुंबई**
दुकान क्र. ९, निशांत सोसायटी, अविनाश टॉवर समोर,
सात बंगलोज, अंधेरी (पश्चिम), मुंबई -५३.
कार्यालयः ८०९७००२८९० - ९८२१५२०७१२.
ईमेलः adv.sureshsawant@gmail.com

## परिशिष्ट - १६
(उप विधी क्र. ३५ अन्वये)

**संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याच्या समभाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास दावे किंवा आक्षेप आमंत्रित करणाऱ्या सूचनेचा अर्ज. (मोठा खप असलेल्या दोन स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करणे)**

### सूचना

**मोहिद हाईट्स** को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पत्ता **सीटीएस क्र. ८२५ (भाग), आर.टी.ओ. रोड, म्हाडा सिग्नल जंक्शन, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३** च्या सदस्या आणि संस्थेच्या इमारतीमधील **८ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ८०४ मोजमाप ८४० चौ.फू. बिल्ट अप मधील** ५०% हिश्शाच्या धारणकर्त्या श्री/श्रीमती. **सौ. अफ्रोझरा मोहम्मद अस्लम इब्राहिम उर्फ अफ्रोझ रफिक पटेल** यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता **दि. १० सप्टेंबर, २०२५** रोजी निधन झाले.

संस्था याद्वारे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदार / आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये, संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्यांच्या/ आक्षेपांच्या समर्थनार्थ कागदपत्रे आणि इतर पुराव्यांच्या प्रतींसह, दावे किंवा आक्षेप मागवित आहे. वर विहीत केलेल्या कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/ आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था दिवंगत सदस्याच्या संस्थेच्या भांडवल / मालमत्तेमधील भाग आणि हितसंबंध संस्थेच्या उप-विधी अंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास मुक्त असेल. संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास दावे/ आक्षेप, जर असल्यास, संस्थेस प्राप्त झाल्यास त्याबाबत संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार केला जाईल. संस्थेच्या नोंदणीकृत उप-विधीची प्रत दावेदार / आक्षेपदारांना पाहण्याकरिता संस्थेच्या कार्यालयात / संस्थेच्या सचिवांकडे सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून तिच्या कालावधी समाप्तीपर्यंत स. १०.०० ते सायं. ५.०० या दरम्यान उपलब्ध असेल.

**श्री. सुरेश आर सावंत**
**ॲडव्होकेट उच्च न्यायालय, मुंबई**
९, निशांत सीएचएस लि.,
अविनाश टॉवर समोर, ७ बंगलोज,
अंधेरी (पश्चिम), मुंबई - ५३.
९८२१५२०७१२/९३२४०२७८३५
adv.sureshsawant@gmail.com
ठिकाण: मुंबई

**मोहिद हाईट्स सीएचएस लि.**
**करिता आणि त्यांच्या वतीने**
सीटीएस क्र. ८२५ (भाग),
आरटीओ रोड, म्हाडा सिग्नल
जंक्शन, अंधेरी (प), मुंबई - ५३
(मान. सचिव)
दिनांक: २४.०४.२०२६

## परिशिष्ट - १६
(उप विधी क्र. ३५ अन्वये)

**संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याच्या समभाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास दावे किंवा आक्षेप आमंत्रित करणाऱ्या सूचनेचा अर्ज. (मोठा खप असलेल्या दोन स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करणे)**

### सूचना

कॉस्मोपोलिस को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पत्ता **गाव ओशिवरा, लोकमान्य टिळक रोड, ऑक्सफोर्ट टॉवर, यमुना नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३** चे सदस्य आणि संस्थेच्या इमारतीच्या **"ए" विंग** मधील **३ ऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३०५ मोजमाप ६७.२२ चौ.मी. बिल्ट अप** व त्यासह स्टिल्टवरील कार पार्किंग जागा क्र. २० च्या धारणकर्त्या श्री/श्रीमती. **सौ. अफ्रोझरा मोहम्मद अस्लम इब्राहिम उर्फ अफ्रोझ रफिक पटेल** यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता **दि. १० सप्टेंबर, २०२५** रोजी निधन झाले.

संस्था याद्वारे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदार / आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये, संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्यांच्या/ आक्षेपांच्या समर्थनार्थ कागदपत्रे आणि इतर पुराव्यांच्या प्रतींसह, दावे किंवा आक्षेप मागवित आहे. वर विहीत केलेल्या कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/ आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था दिवंगत सदस्याच्या संस्थेच्या भांडवल / मालमत्तेमधील भाग आणि हितसंबंध संस्थेच्या उप-विधी अंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास मुक्त असेल. संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास दावे/ आक्षेप, जर असल्यास, संस्थेस प्राप्त झाल्यास त्याबाबत संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार केला जाईल. संस्थेच्या नोंदणीकृत उप-विधीची प्रत दावेदार / आक्षेपदारांना पाहण्याकरिता संस्थेच्या कार्यालयात / संस्थेच्या सचिवांकडे सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून तिच्या कालावधी समाप्तीपर्यंत स. १०.०० ते सायं. ५.०० या दरम्यान उपलब्ध असेल.

**श्री. सुरेश आर सावंत**
**ॲडव्होकेट उच्च न्यायालय, मुंबई**
९, निशांत सीएचएस लि.,
अविनाश टॉवर समोर, ७ बंगलोज,
अंधेरी (पश्चिम), मुंबई - ५३.
९८२१५२०७१२/९३२४०२७८३५
adv.sureshsawant@gmail.com
ठिकाण: मुंबई

**कॉस्मोपोलिस सीएचएस लि.**
**करिता आणि त्यांच्या वतीने**
गाव ओशिवरा, ऑक्सफोर्ट
टॉवर समोर, एल टी रोड,
अंधेरी (प), मुंबई - ५३
(मान. सचिव)
दिनांक: २४.०४.२०२६

## अर्ज क्र. एनसीएलटी. ३ए
(नियम ३५ पहा)
राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपिठासमक्ष
कंपनी याचिका (आयबी) क्र. ४१८६ वर्ष २०१८
मध्ये
अंतरिम आदेश अर्ज (आयबीसी) क्र. ९३१ वर्ष २०२३

### अंतरिम आदेश अर्जाची सूचना

**हरीश कांत कौशिक**
**सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेडचे**
**ठराव व्यावसायिक**
कार्यालय - सदनिका क्र. १९०४, सॅफायर,
रिजेन्सी टॉवर्स, कावेसार, घोडबंदर रोड,
ठाणे (प), महाराष्ट्र - ४००६१५ ... अर्जदार

**विरुद्ध**

**१. ओम रमेश सावंत**
पत्ता - ए-६०४, भैरव अपार्टमेन्ट्स,
ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी (प),
मुंबई - ४०००५८ ... प्रतिवादी क्र. १

**२. रमेश दत्तात्रय सावंत**
ए-६०४, भैरव अपार्टमेन्ट्स,
ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी (प),
मुंबई - ४०००५८ ... प्रतिवादी क्र. २

**३. राम क्लिन्सर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड**
नोंदणीकृत पत्ता, २३ एफ, लक्ष्मी इंड. इस्टेट,
न्यू लिंक रोड, लक्ष्मी प्लाझा,
अंधेरी (प), मुंबई, महाराष्ट्र-४०००५३ ... प्रतिवादी क्र. ३

**४. भुमिका क्लिनटेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड**
नोंदणीकृत पत्ता, २३ एफ, लक्ष्मी इंड. इस्टेट,
न्यू लिंक रोड, लक्ष्मी प्लाझा,
अंधेरी (प), मुंबई, महाराष्ट्र-४०००५३ ... प्रतिवादी क्र. ४

**५. सुपर कोट्स कार्बनलेस पेपर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड**
नोंदणीकृत पत्ता, ए/६०४, भैरव अपार्टमेन्ट्स,
ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी (प),
मुंबई - ४०००५८ ... प्रतिवादी क्र. ५


गंगेज इंक ॲण्ड रेझिन्स प्रायव्हेट लिमिटेड ... याचिकाकर्ता
विरुद्ध
सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेड ... कॉर्पोरेट ऋणको

**यांच्या प्रकरणात**

फसवणूक व्यापारात आणि चुकीच्या व्यापारामध्ये सहभागी असल्याबद्दल प्रतिवादींविरुद्ध निर्देश मागण्यासाठी श्री. हरीश कांत कौशिक, म्हणजेच कॉर्पोरेट ऋणकोचे ठराव व्यावसायिक यांनी दि. ०४.०३.२०२३ रोजी कंपनी याचिका (आयबी) क्रमांक ४१८६/२०१८ मध्ये सादर केलेला राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण नियमन २०१६ च्या नियमन ११ आणि नादारी आणि दिवाळखोरी संकेत २०१६ च्या कलम ६०(५) सह वाचावयाच्या कलम ६६ आणि ६७ अंतर्गत, अंतरिम आदेश अर्ज क्रमांक ९३१ वर्ष २०२३. शीर्षकबद्ध अंतरिम आदेश अर्ज दि. १२.०५.२०२६ रोजी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठासमोर सुनावणीसाठी निश्चित करण्यात आला आहे. सदर अंतरिम आदेश अर्जाचे समर्थन किंवा विरोध करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्याचे नाव आणि पत्त्यासह त्याच्या किंवा त्याच्या वकिलाने स्वाक्षरी केलेली त्याच्या हेतूची सूचना अर्जदाराच्या ॲडव्होकेटला, शीर्षकबद्ध अंतरिम आदेश अर्जाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या दोन दिवस आधी अर्जदाराच्या ॲडव्होकेटपर्यंत पोहोचेल अशारितीने पाठवावी. शीर्षकबद्ध अंतरिम आदेश अर्जाला तो कुठे विरोध करू इच्छित आहे, विरोधाचे कारण किंवा त्याच्या शपथपत्राची प्रत अशा सूचनेसोबत सादर करावी. शीर्षकबद्ध अंतरिम आदेश अर्जाची प्रत निम्नस्वाक्षरीकाराकडून आवश्यक असलेल्या कोणत्याही व्यक्तीला विहित शुल्क भरून दिली जाईल.

दिनांक: २४ एप्रिल, २०२६
**(सही)**
**ॲड. जी. अनिरुथ पुरुसोथमन**
**(अर्जदाराकरिता ॲडव्होकेट)**
**पत्ता:** कार्यालय क्र. १२०२, १२ वा मजला, दलामल टॉवर, नरिमन पॉईंट, फ्री प्रेस मार्ग, मुंबई ४०००२१.
ईमेल: aniruth@lex-legal.in

## टॉम क्रूझचा थरार पुन्हा पडद्यावर




टॉम क्रूझच्या चाहत्यांसाठी ही एक आनंदाची पर्वणी ठरणार आहे. 'टॉप गन' या जगप्रसिद्ध चित्रपटाला ४० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पॅरामाउंट पिक्चर्सने हा मूळ चित्रपट आणि त्याचा सिक्वल पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर प्रदर्शित करण्याची घोषणा केली आहे. १५ मे २०२६ पासून भारतात केवळ एका आठवड्यासाठी हे दोन्ही चित्रपट चित्रपटगृहात अनुभवता येतील. १९८६ मध्ये आलेल्या मूळ 'टॉप गन' चित्रपटाने जागतिक सिनेमात एक वेगळा इतिहास रचला होता. टोनी स्कॉट दिग्दर्शित या चित्रपटात टॉम क्रूझने पीट मॅव्हरिक मिचेल ही धाडसी वैमानिकाची भूमिका साकारून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले होते. आता नव्या पिढीला आणि जुन्या चाहत्यांना पुन्हा एकदा तोच थरार मोठ्या पडद्यावर पाहण्याची संधी मिळणार आहे.

विशेष म्हणजे, या पुन:प्रदर्शनात २०२२ चा सर्वाधिक गाजलेला 'टॉप गन: मॅव्हरिक' हा चित्रपट देखील समाविष्ट आहे. या चित्रपटाने जगभरात १.५ अब्ज डॉलर्सहून अधिक कमाई करून विक्रम प्रस्थापित केले आहेत. जोसेफ कोसिन्स्की दिग्दर्शित या भागात जुन्या आठवणींना उजाळा देत आधुनिक काळातील विमान युद्धाचे चित्तथरारक चित्रण करण्यात आले आहे. टॉम क्रूझची ॲक्शन आणि विमानांच्या चित्तथरारक कसरती अनुभवण्यासाठी सिनेरसिक या संधीची आतुरतेने वाट पाहत आहेत.

## 'डग डग'ला 'पाठिंबा'

चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक अनुराग कश्यप, निखिल अडवाणी, विक्रमादित्य मोटवाने आणि वासन बाला यांनी दिग्दर्शक ऋत्विक पारीक यांच्या 'डग डग' या चित्रपटाला पाठिंबा दिला असून हा चित्रपट आता ८ मे २०२६ रोजी भारतात प्रदर्शित होणार आहे. अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये कौतुक मिळवल्यानंतर हा उपरोधिक विनोदी आणि रहस्यमय चित्रपट अखेर भारतीय प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'डग डग' हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित असून तो समाजातील श्रद्धा आणि अंधश्रद्धा या विषयावर भाष्य करतो.







या चित्रपटाबद्दल बोलताना अनुराग कश्यप म्हणाले की, या चित्रपटाची कथा सांगण्याची पद्धत, छायांकन आणि संगीत पाहून ते थक्क झाले. हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होणे आवश्यक होते, म्हणूनच आम्ही चौघांनी एकत्र येऊन याला पाठिंबा देण्याचे ठरवले. २०२१ मध्ये टोरंटो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात याचे जागतिक प्रीमियर झाले होते, त्यानंतर मेलबर्न, लॉस एंजेलिस आणि मुंबई (मामी) यांसारख्या अनेक प्रतिष्ठित महोत्सवांमध्ये या चित्रपटाने वाहवा मिळवली आहे.

## दीपिकाबाबतच्या अफवांना पूर्णविराम

अल्लू अर्जुनच्या बहुप्रतिक्षित 'राका' चित्रपटाबाबत सध्या चित्रपटसृष्टीत मोठी चर्चा सुरू आहे. या चित्रपटात अभिनेत्री दीपिका पदुकोण देखील मुख्य भूमिकेत असून, तिने तिच्या दुसऱ्या गरोदरपणाची घोषणा केल्यानंतर चित्रपटातील तिची भूमिका कमी करण्यात आल्याच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र, चित्रपटाच्या टीमने या सर्व चर्चा फेटाळून लावल्या आहेत.



चित्रपटाच्या अधिकृत टीमने स्पष्ट केले आहे की, दीपिका पदुकोण या चित्रपटाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे आणि सर्व काही पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार सुरू आहे. तिची भूमिका कमी केल्याच्या बातम्या पूर्णपणे बिनबुडाच्या आहेत.

दीपिका आपल्या कामाचा वेग कमी करण्याच्या विचारात नाही. तिने नुकतीच एका ब्रँडची जाहिरात चित्रित केली असून, लवकरच ती 'राका' चित्रपटातील काही कठीण ॲक्शन दृश्यांचे चित्रीकरण करणार आहे. सेटवर तिच्या सुरक्षेची आणि प्रकृतीची पूर्ण काळजी घेऊन हे चित्रीकरण पार पडणार आहे. 'सिंगम अगेन' नंतर दीपिकाकडे अनेक मोठे चित्रपट आहेत. 'राका' व्यतिरिक्त ती सिद्धार्थ आनंद यांच्या 'किंग' या चित्रपटात शाहरुख खानसोबत दिसणार आहे. थोडक्यात दीपिका पदुकोणच्या वैयक्तिक आयुष्यातील आनंदाच्या बातम्यांचा तिच्या व्यावसायिक बांधिलकीवर कोणताही परिणाम झालेला नाही.

## 'मटका किंग'ला 'दिलासा'



बॉम्बे हायकोर्टाने विजय वर्माची मुख्य भूमिका असलेल्या 'मटका किंग' या वेब सीरिजच्या नावावरून सुरू असलेला कायदेशीर वाद मिटवला असून निर्मात्यांना मोठा दिलासा दिला आहे. रॉय कपूर प्रोडक्शन्सच्या विरोधात दाखल करण्यात आलेला हा खटला तक्रारदाराने मागे घेतल्यामुळे आता ही मालिका कोणत्याही अडथळ्याविना 'प्राईम व्हिडिओ'वर प्रदर्शित होऊ शकणार आहे. कल्याणजी भगत यांच्या नातीने, तनुजा भगत यांनी या मालिकेच्या नावावर आणि कथेच्या अधिकारांवर आक्षेप घेत न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या मते, ही मालिका त्यांचे आजोबा आणि मूळ 'मटका किंग' कल्याणजी भगत यांच्या जीवनावर आधारित असून यासाठी त्यांची परवानगी घेण्यात आली नव्हती.

न्या. शर्मिला देशमुख यांच्यासमोर रोजी या प्रकरणाची सुनावणी झाली, ज्यामध्ये न्यायालयाने चित्रपट प्रदर्शनास स्थगिती देण्यास नकार दिला. त्यानंतर वादीने आपला खटला मागे घेण्याचा निर्णय घेतला असून यामुळे हा कायदेशीर वाद पूर्णपणे संपुष्टात आला आहे. नागराज मंजुळे यांच्या दिग्दर्शनामुळे आणि विजय वर्माच्या अभिनयामुळे या मालिकेला आधीच प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे निर्मात्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

## यशराज फिल्मसची पावले भयपटाकडे...

यशराज फिल्म्स या भारताच्या अग्रगण्य निर्मिती संस्थेने आपल्या ५० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच हॉरर या प्रकारात पाऊल ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. 'रॉकेट बॉईज' सारख्या गाजलेल्या मालिकेचे दिग्दर्शक अभय पन्नू या पहिल्या हॉरर चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. यशराज फिल्म्सने आतापर्यंत जवळजवळ सर्वच प्रकारचे चित्रपट बनवले आहेत, मात्र भयपट त्यांच्यासाठी नवीन आहे. आदित्य चोप्रा यांनी या चित्रपटाची जबाबदारी त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षय विधानी यांच्याकडे सोपवली आहे.



'सय्यारा'च्या यशानंतर यशराज फिल्म्स आता नव्या पिढीच्या कथाकारांसोबत काम करण्यावर भर देत आहे. यामध्ये मोहित सुरी, समीर सक्सेना आणि अभय पन्नू यांसारख्या दिग्दर्शकांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, आदित्य चोप्रा यांनी चित्रपट निर्मितीच्या प्रक्रियेचे विकेंद्रीकरण केले असून, अक्षय विधानी आणि त्यांची टीम आता स्वतंत्रपणे नवीन विषयांवर काम करत आहे. या चित्रपटाचे नाव अद्याप ठरलेले नसून, अभय पन्नू यांनीच याची संहिता लिहिली आहे. यशराज फिल्म्सचा हा पहिला हॉरर चित्रपट प्रेक्षकांसाठी नक्कीच एक मोठे आकर्षण ठरणार आहे.

## श्रुतीचे स्पेशल साँग



दाक्षिणात्य सुपरस्टार राम चरण यांच्या आगामी 'पेद्दी' या ॲक्शन ड्रामा चित्रपटातील बहुचर्चित 'स्पेशल साँग'बाबत सुरू असलेला सस्पेन्स अखेर संपला आहे. या खास गाण्यासाठी अभिनेत्री श्रुती हासनच्या नावावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले असून, ती लवकरच हैदराबादमध्ये या गाण्याचे चित्रीकरण सुरू करणार आहे. विशेष म्हणजे, या गाण्याला ऑस्कर विजेते संगीतकार ए. आर. रहमान यांनी संगीत दिले असून, श्रुती आणि राम चरण ही जोडी तब्बल १२ वर्षांनंतर पुन्हा एकदा पडद्यावर एकत्र दिसणार आहे. यापूर्वी २०१४ मध्ये 'येवडू' या सुपरहिट चित्रपटात त्यांनी एकत्र काम केले होते. या गाण्यासाठी गेल्या अनेक आठवड्यांपासून विविध नावांची चर्चा सुरू होती. सुरुवातीला मृणाल ठाकूर या गाण्यात दिसणार असल्याची अफवा होती, मात्र तिने यावर कोणतेही भाष्य केले नव्हते. त्यानंतर नयन सारिका, मानसा वाराणसी आणि अगदी दोन दिवसांपूर्वीपर्यंत 'विरूपाक्ष' फेम संयुक्त मेनन हिच्या नावाचीही जोरदार चर्चा होती. मात्र, अखेर या सर्व शर्यतीत श्रुती हासनने बाजी मारली आहे. श्रुतीला अशा प्रकारच्या विशेष गाण्यांचा दांडगा अनुभव असून, यापूर्वी तिने 'तेवर' चित्रपटातील 'मधुबाला' गाण्याने प्रेक्षकांची मने जिंकली होती.

## मराठी सक्ती निर्णयाविरोधात सदावर्ते मैदानात
## भाईंदरमध्ये सदावर्ते आणि मनसे कार्यकर्ते भिडले

■ भाईंदर

**रिक्षाचालकांना** मराठी सक्ती केल्याच्या निर्णयाविरोधात ॲड. गुणरत्ने सदावर्ते मैदानात उतरले आहेत. बुधवारी सदावर्ते यांनी भाजपा आमदार नरेंद्र मेहता यांची भेट घेतली आणि भाईंदर पूर्वेच्या ऑटो रिक्षा युनियनच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी मनसे कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत विरोध दर्शविला. यामुळे मोठा तणाव निर्माण झाला होता.

१ मे पासून रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य करण्यात आली आहे. या निर्णयाविरोधात रिक्षा चालकांनी



आंदोलन पुकारले आहे. या वादात ॲड. गुणरत्ने सदावर्ते रिक्षा चालकांच्या बाजूने मैदानात उतरले आहेत. या आंदोलनाचे नेतृत्व सदावर्ते करणार आहेत. या पार्श्वभूमीवर सदावर्ते यांनी भाजपा आमदार नरेंद्र मेहता यांची भेट घेतली. दुपारी १ वाजता सदावर्ते यांनी न्यू गोल्डन नेस्ट येथे रिक्षाचालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. त्याची माहिती मिळताच मनसेचे काही कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचले आणि दोन्ही बाजूने जोरदार घोषणाबाजी सुरू झाली. राज ठाकरे यांचा अपमान सहन केला जाणार नाही, असा इशारा मनसेने दिला तर राज ठाकरे यांची वैचारिक दिवाळखोरी झाली आहे, असे प्रत्युत्तर सदावर्ते यांनी दिले.

## चर्चगेटमध्ये टाटा समूहाच्या तनिष्कवर पालिकेची कारवाई

**मुंबई** - चर्चगेट परिसरात अतिक्रमणाविरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेने धडक कारवाई करत तनिष्क ज्वेलरी शोरूमच्या बाहेरील अतिक्रमणावर हातोडा चालवला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पालिकेने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले. महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने चर्चगेटमध्ये सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान संबंधित शोरूमसमोरील फूटपाथ व सार्वजनिक जागेवर केलेले अनधिकृत बांधकाम व विस्तार हटवले. या कारवाईसाठी अधिकाऱ्यांसह मनुष्यबळ आणि आवश्यक यंत्रसामग्री तैनात करण्यात आली होती.

## वॉर्ड क्र. २५ मधील महिला कार्यकर्त्या प्रवीण दरेकर यांच्या उपस्थितीत भाजपात

■ मुंबई

**मागाठाणे** विधानसभा क्षेत्रातील वॉर्ड क्रमांक २५ च्या नगरसेविका निशा परुळेकर-बंगेरा यांच्या नेतृत्वाखाली आणि भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्षातील महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आज भाजपाचे कमळ हाती घेतले. या पक्षप्रवेशामुळे मागाठाणे विधानसभा क्षेत्रात भाजपात बळकटी निर्माण झाली.

शिवसेनेच्या महिला शाखाप्रमुख प्रीती इंगळे, शाखा समन्वयक स्वाती अवताडे, कार्यालय प्रमुख कुसुम बोक्का यांच्या मार्गदर्शनाखाली उपशाखाप्रमुख माधुरी साटम, अनिता शर्मा, शुभांगी साईल, मीना कांबळे, विशाखा कांबळी, अर्चना भादवणकर, वंदना हाडपे, मिरा पोपळे, सुधाली तावडे, कल्पना गायकवाड, ताजबी शेख, क्रांती बिष्णोई, गटप्रमुख पूनम गौड, श्रेया दुबे, अर्चना दुबे, लता खोडवे, रीमा गुप्ता, सुजाता सकपाळ, नीला कलाल, गजा बरंवाल, अर्चना मिश्रा, संतोषी पवार, प्रिया मेस्त्री, किरण दिगर्से, करुणा कटके, सुजाता पवार, मीना गुप्ता यांनी प्रवीण दरेकर यांच्या उपस्थितीत भाजपाचा झेंडा हाती घेतला.

यावेळी दरेकर यांनी पक्षात सहभागी झालेल्या सर्व महिला कार्यकर्त्यांचे स्वागत केले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपा उत्तर मुंबई जिल्हा महामंत्री आप्पा बेलवलकर, महिला जिल्हा अध्यक्षा शीतल आंब्रे, जिल्हा उपाध्यक्षा प्रिया मिटके, मागाठाणे विधानसभा संयोजक कृष्णकांत दरेकर, मागाठाणे दक्षिण विधानसभा अध्यक्ष अविनाश राय, वॉर्ड अध्यक्ष पवन तिवारी, महिला वॉर्ड अध्यक्षा सुनयना कदम, युवा अध्यक्ष अभिषेक पवार यांसह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## बीड कारागृहातील मारहाण प्रकरण
## धनंजय देशमुख मुख्यमंत्र्यांना पत्र देणार

■ बीड

**बीडच्या** जिल्हा कारागृहात मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड गँग इतर गुन्ह्यातील कैद्यांना मारहाण करत असल्याची एक कथित ऑडिओ क्लिप काल व्हायरल झाली. यानंतर देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील आठवड्यात ते मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन कारागृहातील परिस्थितीवर चर्चा करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

धनंजय देशमुख यांनी सांगितले की, कारागृहात सुरू असलेल्या प्रकारांना आळा घालण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. कैद्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांचे वेगवेगळ्या कारागृहात स्थलांतर (ट्रान्सफर) करण्याची मागणीही ते पत्राद्वारे करणार आहेत.जेलर बदलल्यानंतर सुरू असलेल्या प्रकारांकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही. कैद्यांना कोणाचे अभय आहे, त्यांना कशी वागणूक दिली जाते, याची चौकशी होणे आवश्यक आहे. या प्रकरणाला वेगळे वळण देणाऱ्या २ ऑडिओ क्लिप्स व्हायरल झाल्या आहेत. पहिल्या क्लिपमध्ये वाल्मिक कराड गँगशी संबंधित सुदर्शन घुले, प्रतीक घुले व इतरांनी कैदी अझर अब्दुल रहमान पठाण याला मारहाण केल्याचा दावा करण्यात आला होता.

## भोंदू खरातला पाचव्या गुन्ह्यात ६ मे पर्यंत न्यायालयीन कोठडी

■ नाशिक

**सिन्नर** तालुक्यातील भोंदूबाबा अशोक खरातच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत आहेत. आज त्याला पाचव्या गुन्ह्यात नाशिक सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. सुनावणीनंतर न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली असून ६ मे पर्यंत त्याची रवानगी कारागृहात करण्यात आली आहे.

दरम्यान, तपास अधिकाऱ्यांनी सहाव्या गुन्ह्याच्या तपासासाठी अशोक खरातचा ताबा मिळावा यासाठी न्यायालयाकडे अर्ज सादर केला. पाचव्या गुन्ह्यात कोठडी मिळाल्यानंतर त्याला नाशिक रोड येथील मध्यवर्ती कारागृहात हलवण्यात येणार आहे.

त्याची वैद्यकीय तपासणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विशेष तपास पथकाकडून त्याला सहाव्या गुन्ह्याच्या तपासासाठी पुन्हा ताब्यात घेतले जाणार आहे. पुढील कारवाईसाठी त्याला उद्या पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

### 'समता'च्या खवकेंवर अब्रुनुकसानीचा दावा?

भोंदू खरात प्रकरणात वेगवेगळे आरोप होत असलेली समता पतसंस्था ओमप्रकाश खवके यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा करणार असल्याची माहिती आहे. ओमप्रकाश खवके यांनी अनेकांचे काळे पैसे पांढरे करण्याचा या पतसंस्थेचा धंदा असल्याचा आरोप करत खवके यांनी पोलिसांना पुरावे दिले. मात्र, खवके यांच्या कर्ज वसुलीबाबतची संस्थेची २००९ मधील न्यायालयीन लढाई सुरु असल्याची माहिती आहे. पूर्वीचा राग मनात धरून त्याने बेछूट आरोप केल्याचा दावा संस्थेने केला आहे. दरम्यान, या खरात प्रकरणामुळे पतसंस्थेचे अध्यक्ष काका कोयटे यांनी पदाचा राजीनामा दिला.

## नेस्को प्रकरणातील मुख्य आरोपी खेमलानी बँकॉकला पळून गेला

■ मुंबई

**गोरेगाव** येथील नेस्को येथे आयोजित म्युझिकल कॉन्सर्टदरम्यान ड्रग ओव्हरडोसमुळे दोन एमबीए विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत ११ आरोपींना अटक केली असून मुख्य आरोपी महेश खेमलानी बँकॉकला पळून गेल्याची माहिती पोलीस उपायुक्त महेश चिमटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पोलीस उपायुक्त महेश चिमटे म्हणाले की, ११ एप्रिल रोजी घडलेल्या या घटनेच्या तपासात वनराई पोलिसांनी मोठी कारवाई करत ९३३ अमली पदार्थांच्या गोळ्या जप्त केल्या आहेत. या गोळ्यांची अंदाजे किंमत सुमारे १५.३९ लाख रुपये आहे. तपासादरम्यान मुख्य आरोपी आयुष साहित्य याला पोलादपूर पोलिसांच्या हद्दीत अटक करण्यात आली होती. मात्र, या प्रकरणातील आणखी एक

### पोलिसांची माहिती

मुख्य सूत्रधार परदेशात फरार आहे. या प्रकरणात ३३ वर्षीय झिया जेकब हिला काल अटक करण्यात आली असून, ती या प्रकरणातील अकरावी आरोपी आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, झिया जेकब ही आर्थिक व्यवहारांची मध्यस्थ म्हणून काम करत होती. ती फरार मुख्य आरोपीची लिव्ह-इन पार्टनर असल्याचेही उघड झाले आहे.

## थकीत भाड्यामुळे विराट कोहलीशी संबंधित बंगळुरूच्या रेस्टॉरंटला टाळे

**बंगळुरूमधील चर्चेत असलेले वन ८ कम्यून हे नामांकित रेस्टॉरंट न्यायालयाच्या आदेशानंतर बंद करण्यात आले. तब्बल दोन कोटी रुपयांहून अधिक भाडे, देखभाल शुल्क आणि इतर देणी थकवल्यामुळे ही कारवाई केल्याची माहिती आहे. या प्रकरणामुळे क्रिकेटपटू विराट कोहलीचे नाव पुन्हा चर्चेत आले. मात्र, त्याने या रेस्टॉरंटशी असलेली भागीदारी यापूर्वीच संपवल्याची माहिती आहे.**

■ बंगळुरू

**वन** ८ कम्यून हे रेस्टॉरंट एका खासगी संस्थेमार्फत चालवले जात होते. त्यांनी मागील सहा महिन्यांपासून नियमित भाडे भरले नव्हते. त्याचबरोबर इमारतीच्या देखभालीसाठी आकारण्यात येणारे शुल्क आणि उत्पन्नातील



ठरावीक हिस्साही थकवला होता. मालकांकडून वारंवार सूचना देऊनही त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. अखेर इमारतीच्या मालकांनी न्यायालयात धाव घेतली. सुनावणीनंतर न्यायालयाने थकीत रक्कम वसूल होईपर्यंत उपाहारगृह बंद ठेवण्याचा आदेश दिला. त्यानंतर अधिकाऱ्यांनी येऊन उपाहारगृहाला टाळे ठोकले. विराट कोहली यांच्या नावाशी संबंधित असल्याने या रेस्टॉरंटला सुरुवातीला मोठी प्रसिद्धी मिळाली होती. देशातील अनेक शहरांमध्ये या नावाखाली रेस्टॉरंट साखळी उभारली होती. मात्र या ठिकाणाविरोधात यापूर्वीही अनेक तक्रारी मिळाल्या होत्या. त्यांना महानगरपालिकेकडून अनेकदा नोटिसा दिल्या. या सततच्या वादांमुळे रेस्टॉरंटची प्रतिमा मलिन झाली. याचा परिणाम ग्राहकसंख्येवर झाला व उत्पन्न घटल्याने आर्थिक अडचणी वाढतच गेल्या.

## कर्मचाऱ्यांच्या संपाचा मुद्रांक सेवांवर परिणाम

**वाशिम**- जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह विविध मागण्यांसाठी राज्यभरातील शासकीय कर्मचारी संघटनांनी पुकारलेल्या संपाचा आज तिसरा दिवस होता. या संपाचा थेट परिणाम महसूल विभागावर झाला असून, वाशिममध्ये मुद्रांक उपलब्ध नसल्यामुळे बँक, शिक्षण तसेच इतर शासकीय कामे मोठ्या प्रमाणात रखडली आहेत. महसूल विभागातील कर्मचारी संपात सहभागी झाल्याने दैनंदिन व्यवहारांवर परिणाम जाणवत आहे. दस्तऐवज नोंदणी, करारपत्रे, शासकीय कागदपत्रांची पूर्तता यांसारखी महत्त्वाची कामे ठप्प झाली आहेत. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही जिल्हाधिकारी कार्यालयातील १,०१२ पैकी तब्बल ८३६ कर्मचारी संपात सहभागी असल्याने प्रशासनाचे कामकाज ठप्प झाले आहे.

## ठाण्याच्या सॅटिस पुलावर 'शिवशाही' बसला आग

■ ठाणे


**ठाणे** रेल्वे स्थानक परिसरातील सॅटिस पुलावर उभी असलेली 'शिवशाही' बसने अचानक पेट घेतल्याने एकच खळबळ उडाली. काही क्षणांतच बसमधून धुराचे मोठे लोट बाहेर पडू लागले आणि आगीने भीषण रुप धारण केले. या घटनेमुळे स्टेशन परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये भीती पसरली.

शिवशाही बस ठाणे येथून पालघरमार्गे बोईसरकडे जाण्यासाठी निघाली होती. मात्र ठाणे स्टेशनजवळ आल्यानंतर बस अचानक बंद पडली. चालक बसची तपासणी करत असतानाच बसच्या खालच्या भागातून धूर निघू लागला आणि काही क्षणांतच आग



लागली. इंजिन आणि डिझेल टाकी जवळ लागलेल्या आगीने झपाट्याने संपूर्ण बसला वेढा घातला. घटनेच्या वेळी बसमध्ये सुमारे १५ प्रवासी होते. आग लागल्याचे लक्षात येताच प्रवासी तत्काळ बसमधून बाहेर पडले. त्यांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, बस पूर्णपणे जळून खाक झाल्याने प्रवाशांचे सामान नष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी पाण्याचा जोरदार मारा करत आग आटोक्यात आणली.

## नवाकाळ शब्दकोडे-१५८५



**आडवे शब्द –**

१. या ना त्या मार्गाने, काय वाट्टेल ते करून ५. पंक्तिप्रपंच, दुजाभाव ८. तेज १०. शीघ्र ११. चंचल मन १२. पारंब्यांचे झाड १३. दोन्ही १५. गर्व १६. बेरकी १८. बेचव १९. जमीनदोस्त (हिं.) २१. उत्तम पोषण झालेला २३. ठाऊक २४. चणचण, वानवा २५. सुईचे छिद्र २६. नाहक २८. वस्त्र ३०. आच, उष्णता ३१. काळजी ३२. महान ३३. मृत्यू, कालखंड ३४. कृष्णाची आई ३५. नवरात्रातील सामूहिक गुजराथी नृत्य ३८. प्राण ३९. जिवलग ४१. पड खाणे, माघार घेणे- xxखाणे ४३. लहान ४५. दिशांच्या आठ देवता, धनसंपत्ती ४७. डामडौल नसलेला ४९. देव ५०. पुष्कळ ५१. टेबल ५२. कथित काळी जादू ५४. उट्टे ५५. निभाव ५६. रेषा ५७. लालूच ५८. घातलेली भीड ५९. प्रवासी, यात्रेकरू ६०. अडवणूक होईल असे कृत्य ६१. उपकार ६२. चोच ६३. सरळसोट बांबू ६५. सोने, कांचन, सुवर्ण ६७. पुस्तकातील निवडक भाग ६८. देवांचा राजा ६९. प्रथम ७१. आश्रय ७३. चुगलखोरी ७५. महिना, माह ७७. बड्याबोळ ७९. आश्चर्य ८१. नियमित येणेजाणे ८२. सूर्य ८४. कंटाळा ८६. बहुसंख्य लोकांचे सकाळचे पहिले पेय ८७. पक्का ८७अ. फुलाची पाकळी, सैन्याची तुकडी ८९. धुंद ९१. जादूगाराची थैली ९३. मागितलेला खुलासा, उत्तर ९४. दर, किंमत अथवा मनातील भावना ९५. विहिरीचा अरूंद प्रकार- xxx कूप ९६. खोल बुडी मारणे ९८. प्रकट, उघड ९९. दंव १००. ध्येय, उद्दिष्ट १०१. हात १०२. कुटुंबप्रमुख, पती १०३. ढंग, ढब, धाटणी १०४. धातूचे चलन

**उभे शब्द –**

१. 'तेथ म्हणे श्री विश्वेश्वरावो, हा होईल दान पसावो .....' (संत ज्ञानेश्वर) २. मोराचे ओरडणे ३. खळबळ माजवणारे, संताप निर्माण करणारे उदाहरणार्थ भाषण ४. वाळू ५. अतिरेकी ६. आहार-विहाराचे नियम ७. सूर्य ८. आकर्षण ९. शेगडीतील इंधन, सरपण ११. आर्द्रता १३. उपरोध १४. बायको १६. उचित १७. दरवर्षी १९. प्रपात २०. विज्ञान २१. समोर, आगे २२. कमी प्रमाणात २५. आझाद हिंद सेना स्थापन करणारे स्वातंत्र्य सेनानी २६. मनोभंग, आनंदावर विरजण २७. वडिलांचा भाऊ २८. कोर्टात बाजू मांडणारा २९. वस्तू, पर्वत ३६. पातळ भाजी ३७. गुंतागुंतीचे, किचकट ४०. फारच विशेष ४२. विष्णू ४४. दिवाभीत पक्षी ४५. बोकड ४६. आकलन ४८. लगबग, धांदल ५१. ढग ५३. बहुगुणी तेलबिया ५५. स्वयंपाकाचे कसब ५६. महिषी ५७. शपथ ६०. डोक्याला झालेली जखम ६१. वेदातील रचना ६३. कौशल्य ६४. गोष्ट, कहाणी ६६. नूतन ६७. गावाची शीव ७०. घाणेरडे, अभद्र ७२. देश ७४. जाहीर करणे, बोलून दाखवणे ७५. वस्तू, जिन्नस ७६. किनारा ७८. नाजूक ८०. वाकडा ८१. चर्चा, शहानिशा ८२. वृद्धी ८३. अपराधी व्यक्तीच्या वतीने बाजू मांडणे ८४. शत्रुत्व ८५. भूतकाळ ८७. अंध ८८. उपवासाचा आदला दिवस ९०. अग्नी ९२. पुत्र ९४. मनोभाव, मनोलहरी, मनाचा ग्रह ९७. थंड ९८. दिल्लीतील मोठी मशीद •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५८४ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. ससाणा ३. संपादकीय ६. धटिंगण ८. चलाखी १०. निबर ११. पराग १२. सुरा १३. आबालवृद्ध १४. अकबर १५. ललितापंचमी १७. धाबा १८. रवाना १९. वाफ २०. थर २२. बनारस २४. शमन २५. चोपडी २६. सृजन २८. थट्टा २९. ठोक ३०. गीता ३२. यष्टी ३३. तजेला ३४. घसा ३६. ठक ३८. उच्च ३९. वांड ४०. कडबा ४२. सहारा ४४. पीस ४६. याम ४८. इच्छित ४९. हाड ५०. खवा ५२. वातावरण ५३. बाळी ५४. पुनव ५६. रुबाई ५८. तग ६०. रातोरात ६१. गुन्हा ६२. धनी ६५. जाते ६६. मीन ६७. पुळी ६८. लांबी ६९. गडवा ७१. शूर ७२. लाली ७३. पुन्हा ७४. आब ७६. तटाक ७८. टाहो ७९. स्तवन ८१. तारीख ८२. थाटणे ८३. प्रारब्ध ८४. वज्रपात ८६. कान ८७. डबोले ८८. लोणी ८९. तातडी ९१. तळमळ ९३. मत ९४. हजारो ९७. पान ९८. उद ९९. मानभावी १०१. तगमग १०२. समय १०३. खबरबात

**उभे शब्द :** २. साईबाबा ३. संबद्ध ४. पार ५. कीटकनाशक ६. धरा ७. टिंगल ८. चराचरसृष्टी ९. खीर १०. निवृत्तीनाथ ११. परवानगी १२. सुपंथ १३. आधार १४. अवा १६. लिखापढी १८. रस २१. धनदांडगा २३. रट्टा २७. जो जे वांछिल तो ते लाहो प्राणीजात २९. ठोसा ३१. ताठ ३२. यच्चयावत ३४. घबाड ३५. महा ३७. कपी ४१. डहाळी ४२. समान ४३. राख ४५. सवाई ४७. मरगळ ५१. वारू ५३. बातमी ५४. पुन्हापुन्हा ५५. वध ५७. बाड ५९. गोबरगणेश ६०. राजा ६३. नीलांबर ६४. रडतखडत ७०. वाटा ७३. पुनवडी ७५. संतान ७७. कथालेखन ७९. स्तब्धता ८०. कपात ८५. तळपाय ८६. काळ ८८. लोह ९०. तरंग ९२. मन ९३. सादर ९५. रोग ९६. भास ९८. उब ९९. मात १००. भाग्य

# शिवाजी कोण होता? प्रकाशकाला आमदार गायकवाडांची अर्वाच्च शिवीगाळ

पान १ वरून

गौरवशाली इतिहासाशी छेडछाड करण्यात आल्याचे दिसले. पुस्तकाच्या प्रत्येक पानावर शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख आहे. शिवाजी महाराज क्षत्रिय होते की नाही, ते ९६ कुळी होते की नाही, असे बेछूट प्रश्न विचारण्यात आले आहेत. शिवाजी महाराजांविषयी असा उल्लेख करणारा गोविंद पानसरे कोण होता ? मला हे पुस्तक वाचायची गरज नाही. तुमच्यासारखे नालायक लोक शिवाजी महाराजांना एकेरी भाषेत बोलतात. तुला माहीत आहे ना, त्या गोविंद पानसरेचे काय झाले, त्याची अवस्था काय झाली? मी तुलाही घरात घुसून मारेन. तुला चिरडून टाकेन. तुझी जीभ छाटेन.

प्रकाशक प्रशांत आंबी यांनी आ. गायकवाड यांना समजावण्याचा प्रयत्न केला की, हे जुने पुस्तक आहे. ते पानसरे यांनी लिहिले आहे. तरीही ते आंबी यांना आक्षेपार्ह भाषेत सुनावत राहिले. त्यांनी आंबी यांना तू ब्राह्मण आहेस का, असाही प्रश्न विचारला. आंबी यांनी नकार दिल्यानंतरही आ. गायकवाड यांनी धमकावणे सुरू ठेवले. या संभाषणाबद्दल बोलताना नंतर आंबी म्हणाले की, आ. संजय गायकवाड यांच्यासोबत ९ मिनिटे फोन सुरू होता. त्यांना ते पुस्तक वाचण्यात कोणताही रस होता असे मला वाटले नाही. हे पुस्तक मी लिहिलेले नसून कॉम्रेड पानसरे यांचे लिखाण आहे. हे पुस्तक १९८८ साली प्रकाशित झाले होते. त्यात शिवाजी महाराजांचा अपमान करण्याचा कोणताही हेतू नाही. त्यामुळे तुम्ही आधी ते पुस्तक वाचा, असे सांगितले. आ. गायकवाड यांच्या विरोधात तक्रार दाखल करणार आहे.

हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संजय गायकवाड यांनी एक व्हिडिओ प्रसिद्ध करत स्पष्टीकरण दिले. मात्र, त्यामध्येही त्यांनी आपल्या वक्तव्याचा पुनरुच्चार करत म्हटले की, मी पूर्ण पुस्तक वाचले. इतिहासाची तोडफोड करून छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख या पुस्तकात केलेला आहे. मी प्रकाशकाला भाऊ म्हणून बोललो. त्याची मग्रुरीची भाषा होती. त्याने मला डिवचले. त्यामुळे मी त्याला शिव्या दिल्या. अशांना शिव्याच दिल्या पाहिजे. शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करणाऱ्याची जीभ हासडलीच पाहिजे.

आ. गायकवाड यांच्या वक्तव्यावर तीव्र आक्षेप घेत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या स्नुषा मेधा पानसरे म्हणाल्या की, आ. संजय गायकवाड यांनी कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्याविषयी ज्या पद्धतीची भाषा वापरली त्याचा मी तीव्र निषेध करते. कॉम्रेड गोविंद पानसरेंना अनेक धमक्या आल्या, पण त्यांनी पुस्तकाचे शीर्षक बदलले नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे सौजन्यशील, न्यायप्रिय आणि गोरगरीबांचा, रयतेचा राजा म्हणून ओळखले जातात. त्यांचा वारसा सांगत आणि नाव घेत या पद्धतीची भाषा करणारे नक्की शिवरायांचा कोणता वारसा पुढे नेत आहेत? कॉम्रेड पानसरे यांचे 'शिवाजी कोण होता' हे पुस्तक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहे. त्यांनी जो विचार सांगितला आहे तो मारता येत नाही, त्यावर दुसरा तुल्यबल विचार त्यांच्यापाशी नाही. त्यामुळे अशा पद्धतीचा विचार केला जात आहे. गायकवाड यांनी हे पुस्तक वाचले आहे असे मला वाटत नाही. त्यांनी केवळ पुस्तकाचे शीर्षक बघून हे वक्तव्य केल्याचे दिसते. त्यांनी हे पुस्तक वाचावे हे आवाहन आहे. पुस्तकात कोणत्या प्रकारचे छत्रपती शिवाजी महाराज सांगितले आहेत हे बघावे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही एक पोस्ट करून आ. गायकवाड यांच्यावर टीका केली. त्यांनी म्हटले की, बुलडाणा जिल्ह्याचे नाव बदनाम करण्याचा विडाच आमदार संजय गायकवाड या व्यक्तीने उचलला आहे. मग ते आमदार निवासातील कँटीनमध्ये हाणामारी करणे असो, सुरक्षेसाठी असणाऱ्या पोलिसांना स्वतःची गाडी धुवायला सांगणे असो की आता प्रशांत आंबी यांना धमकी असो. राज्यातील एक लोकप्रतिनिधी, सत्ताधारी पक्षातील आमदार, शिवरायांचा वंशज म्हणवून घेणाऱ्या या व्यक्तीची भाषा आणि शिव्यांची पातळी बघितली तर छत्रपती शिवाजी महाराजांचे नावही यांच्या ओठावर असू नये. कारण ती लायकी यांची नाही. महाराजांनी या भूमीला घालून दिलेले संस्कार भ्रष्ट करण्याचे, महाराष्ट्राची संस्कृती नासवण्याचे, महाराष्ट्राचा पुरोगामी विचार पुसण्याचे काम यांच्यासारख्या विकृत व्यक्तींमुळे होते आहे. तर काँग्रेसचे आ.विजय वडेट्टीवार म्हणाले की, आंबी यांना काही झाले तर संजूला गंजू करुन सोडू, संविधानात जे आहे त्यात राहून बोलावे, पण अशी धमकी देणे हे योग्य नाही. आमदारावर गुन्हा दाखल केला पाहिजे. प्रा.गोविंद पानसरे यांनी जे लिहिले आहे, खरे लिहिले आहे.

पान १ वरून

एका कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारले होते. नंतर हे अन्न शिळे नसल्याचा अहवाल आला. कोरोनाच्या काळात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत असताना संजय गायकवाडांनी त्यावेळचे

### वादग्रस्त आमदार

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस राजकारण करत असल्याची टीका करत म्हटले होते की, मला जर कोरोनाचा विषाणू मिळाला तर देवेंद्र फडणवीसांच्या तोंडात कोंबेन. गेल्या वर्षी शिवजयंतीच्या मिरवणुकीत संजय गायकवाड यांनी एका तरुणाला काठीने मारहाण केली होती. राहुल गांधींची जो जीभ कापेल त्याला ११ लाख रुपये बक्षीस देणार, अशीही घोषणा त्यांनी केली होती. १९८७ साली आपण वाघ मारला होता आणि त्याचा दात गळ्यात घालून फिरतोय असाही त्यांनी दावा केला होता. २०२१ मध्ये गायकवाड यांच्यावर ॲट्रॉसिटी कायद्याचा गैरवापर केल्याचा आरोप झाला. विधानसभेच्या निवडणुकीत कमी मते पडल्यानंतर एका जाहीर सभेत त्यांनी मतदारांना शिव्या देत म्हटले होते की, मतदारांना फक्त दारू आणि मटण पाहिजे. हे दोन हजारांत विकले जातात. यांच्यापेक्षा वेश्या बऱ्या. आ. संजय गायकवाड हे इतके बेताल वागत असूनही एकनाथ शिंदे यांनी त्यांची प्रत्येक कृती पाठीशी घातली आहे. शिंदे गायकवाड यांना आवर का घालत नाहीत, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.

# सुरतच्या रस्त्यावर 'भूत सायकल'चे आश्चर्य

पान १ वरून

आहे हे पाहण्याचे वेड. मोठेपणी ते आधुनिक तंत्रज्ञानापर्यंत पोहोचले. त्यांच्या तीन महिन्यांच्या मेहनतीनंतर आणि पस्तीस हजार रुपयांच्या खर्चातून ही सायकल तयार झाली. विशेष म्हणजे या प्रकल्पासाठी त्यांनी फार महागडे साहित्य वापरले नाही. उलट जुन्या सायकलचा आधार घेऊन त्यात छोट्या पण स्मार्ट इलेक्ट्रॉनिक यंत्रणा बसवल्या. ही सायकल तीन प्रकारे चालवता येते. पहिला प्रकार म्हणजे मोबाईल ॲप. यामध्ये वापरकर्ता आपल्या फोनवरून सायकल पुढे, मागे किंवा वळवू शकतो. दुसरा मार्ग रिमोट कंट्रोल. त्यात सायकल हातातल्या रिमोटने नियंत्रित करता येते. तिसऱ्या स्वयंचलित प्रकारात सायकल स्वतःचा मार्ग ठरवते. तिच्यात बसवलेले सेन्सर मार्गातील अडथळे ओळखतात, दिशा बदलतात आणि सुरक्षितपणे सायकलला पुढे नेतात. म्हणजेच मानवी हस्तक्षेपाशिवाय ही सायकल स्वतः चालते.

या सायकलमध्ये बॅटरी, नियंत्रण यंत्रणा, छोटा संगणक आणि इतर इलेक्ट्रॉनिक भाग बसवलेले आहेत. पुढच्या चाकाला जोडलेली मोटर सायकलला गती देते. हँडलची दिशा नियंत्रित करणारा भाग सायकलला वळवतो. विशेष यांत्रिक रचनेमुळे पॅडलही हलतात. त्यामुळे बाहेरून पाहणाऱ्याला वाटते की कोणीतरी अदृश्य व्यक्ती ही सायकल चालवत आहे. सुरतच्या रस्त्यावर ही सायकल पहिल्यांदा चाचणीसाठी आणली तेव्हा लोकांना विश्वासच बसला नाही. कोणीही चालक नसताना सायकल स्वतः चालताना पाहून अनेकजण आश्चर्याने थांबले. काहींनी डोळे चोळले, वाहतूकही काही काळ मंदावली, काहींनी मोबाईल बाहेर काढले, तर काही तर भीतीने मागे सरकले. ही सायकल स्वतः कशी चालते, असा प्रश्न प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होता. काहींनी फोनवरून आपल्या नातेवाईकांना व्हिडिओ कॉल करून हा चमत्कार दाखवला. झपाट्याने व्हायरल झाले. काही लहान मुलांनी तिला भूत सायकल असे नाव दिले आणि ते नाव लगेच सर्वत्र पसरले.

शिवम व गुरुप्रीतने या सायकलमध्ये रास्पबेरी पाय नावाचा छोटा संगणक, सेन्सर, मोटर कंट्रोलर आणि बॅटरी यांचा वापर केला आहे. हे सर्व पार्ट एकत्र सायकलचे संचालन करवतात. विशेष म्हणजे, हँडल आणि पॅडल यांची रचना अशी केली आहे ती फिरतात तेव्हा बाहेरून पाहणाऱ्याला ती सायकलस्वाराने केलेलीच हालचाल दिसते.

शिवम सांगतो की, त्यांना नेहमीच असे काहीतरी बनवायचे होते जे लोकांना आश्चर्यचकित करेल आणि तंत्रज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण करेल. तर गुरप्रीत म्हणतो की हा प्रकल्प केवळ मनोरंजनासाठी नाही, तर भविष्यातील वाहतूक व्यवस्थेची झलक दाखवणारा एक छोटासा प्रयोग आहे. आज आपण कार, दुचाकी किंवा बसमध्ये चालकावर अवलंबून असतो. पण भविष्यात अशी वाहने येऊ शकतात,जी स्वयंचलित असतील.या सायकलबाबत प्रतिक्रिया देताना कुणी गमतीने म्हटले की, आता सायकललाही माणसाची गरज नाही राहिली. तर तरुणांनी या प्रयोगाचे कौतुक केले. भविष्यात अशा तंत्रज्ञानाचा उपयोग वाहतूक, डिलिव्हरी व आपत्कालीन सेवांमध्ये होऊ शकतो. सध्या या अविश्वसनीय सायकलने कुतूहल निर्माण केले

# रिक्षा-टॅक्सीवाल्यांची परीक्षा मराठी परिच्छेद लिहून दाखवायचा

पान १ वरून

दाखवायचा आहे. या प्रक्रियेदरम्यान चालकांचे परवाने, बॅज आणि रहिवासी दाखले (डोमिसाईल) यांची तपासणी केली जाणार आहे. यापूर्वी भाषा तज्ज्ञांकडून प्रमाणपत्र सादर करून मिळणारी सवलत आता रद्द करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर परिसरात ही मोहीम सुरू झाली. सुमारे १२ हजार चालकांची तपासणी केली जात आहे. त्यापैकी १,८१७ चालकांची भाषा चाचणी घेण्यात आली असून १११ चालकांना मराठी बोलता येत नसल्याचे आढळले.

चाचणीत नापास होणाऱ्या किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्याचे अधिकार आरटीओ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. परिवहन विभागाने महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पण काही ऑटो रिक्षाचालक व संघटनांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. चालकांनी ४ मे पासून संपावर जाण्याचा इशारा दिला आहे.

# भारत नरकाचे द्वार! ट्रम्प यांची पोस्ट

पान १ वरून - तर देशव्यापी मतदानाद्वारे व्हायला हवा. या पत्रासोबत मायकेल सेव्हेज यांचा व्हिडिओही टॅग करण्यात आला आहे. यावर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची प्रतिक्रियादेखील आली आहे. प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी म्हटले की, सध्या आम्ही यासंबंधी काही बातम्या पाहिल्या आहेत, एवढेच मी सांगू शकतो. ट्रम्प यांनी २२ दिवसांपूर्वीच्या व्हिडिओमधील मजकूर शेअर केला आहे. हा व्हिडिओ मायकेल सेव्हेज यांनी १ एप्रिल रोजी त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर लाईव्ह स्ट्रीम केला होता. त्यातील मुद्दे ट्रम्प यांनी ४ पानांच्या स्वरूपात ट्रुथ सोशलवर पोस्ट केले आहेत. या व्हिडिओमध्ये सॅव्हेज म्हणतात की, अमेरिकेचे संविधान त्या काळात लिहिले गेले, जेव्हा लोक हवाई प्रवास करत नव्हते. टेलिव्हिजन, इंटरनेट, रेडिओ याआधीचा तो काळ होता. त्यामुळे संविधानातील अनेक मुद्दे आता अप्रासंगिक झाले आहेत. काही लोक गर्भावस्थेच्या शेवटच्या टप्प्यात अमेरिकेत येऊन मुलांना जन्म देतात. ज्यामुळे त्या मुलांना तत्काळ नागरिकत्व मिळते. त्यानंतर त्याच आधारे ते आपल्या कुटुंबातील इतर सदस्यांनाही अमेरिकेत बोलावतात. अशा घटना आता सामान्य झाल्या असून यामुळे अमेरिकेतील भाषा आणि सांस्कृतिक ओळख बदलत आहे. स्थलांतरितांमध्ये देशाबद्दलची भावना पूर्वीसारखी राहिलेली नाही. तंत्रज्ञान क्षेत्रातील नोकऱ्यांवर भारत आणि चीनमधील लोकांचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळे इतरांसाठी संधी कमी झाल्या आहेत. या क्षेत्रात नोकरी मिळवण्यासाठी पात्रतेपेक्षा तुम्ही कोणत्या देशातून आला आहात, हे अधिक महत्त्वाचे ठरत आहे. त्यामुळे भरती प्रक्रिया निष्पक्ष नसून काही विशिष्ट गटांच्या बाजूने झुकलेली आहे.


**जाहीर सूचना**

(माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ, न्यायालय - I च्या निर्देशांनुसार नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अंतर्गत पारित)

**श्री. बाळाराम कृष्णा पाटील (आरके पाटील इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) च्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी श्री. बाळाराम कृष्णा पाटील यांच्याकरिता आदेश **दिनांक २१ एप्रिल, २०२६** द्वारे नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६च्या कलम १०० अन्वये दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
श्री. बाळाराम कृष्णा पाटील यांच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. १५ मे, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी निम्नस्वाक्षरीकार ठराव व्यावसायिकाकडे सादर करण्याकरिता आमंत्रित करण्यात येत आहे. दावे इलेक्ट्रॉनिक माध्यमे, नोंदणीकृत टपाल, स्पीड पोस्ट किंवा कुरियरद्वारे सादर करता येतील.
**कृपया नोंद घ्यावी:** दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | ऋणको/वैयक्तिक जामीनदाराचे नाव | श्री. बाळाराम कृष्णा पाटील |
| २ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | १०१, बी-विंग, मातृछाया कोम्पल, वाणा आणी, मारुती मंदिराजवळ, जुने पनवेल, जि. रायगड ४१०२०६ |
| ३ | निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्याच्या आदेशाचे तपशील | **सी.पी(आयबी) क्र. १२१३/एमबी/२०२५** आदेश दिनांक २१.०४.२०२६ |
| ४ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक | २१.०४.२०२६ |
| ५ | दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | राजेश शाह IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881 |
| ६ | ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल (नोंदणीकृत) | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता पत्ता आणि ई-मेल | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १५.०५.२०२६ |
| ९ | संबंधित अर्ज: | पीजी ते सीडी विनियमनांअंतर्गत "फॉर्म बी" वेब लिंक: https://www.ibbi.gov.in/home/downloads |

राजेश शाह
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881
एएफए वैधता ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत
दिनांक: २४.०४.२०२६
ठिकाण: पुणे



**जाहीर सूचना**

(माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ, न्यायालय - I च्या निर्देशांनुसार नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अंतर्गत पारित)

**श्री. अरूण अंबू दापोलकर (आरके पाटील इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) च्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी श्री. अरूण अंबू दापोलकर यांच्याकरिता आदेश **दिनांक २१ एप्रिल, २०२६** द्वारे नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६च्या कलम १०० अन्वये दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
श्री. अरूण अंबू दापोलकर यांच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. १५ मे, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी निम्नस्वाक्षरीकार ठराव व्यावसायिकाकडे सादर करण्याकरिता आमंत्रित करण्यात येत आहे. दावे इलेक्ट्रॉनिक माध्यमे, नोंदणीकृत टपाल, स्पीड पोस्ट किंवा कुरियरद्वारे सादर करता येतील.
**कृपया नोंद घ्यावी:** दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | ऋणको/वैयक्तिक जामीनदाराचे नाव | श्री. अरूण अंबू दापोलकर |
| २ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | मुक्काम पो. वहाळ, गव्हाण, घर क्र. ८७७ बी, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ |
| ३ | निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्याच्या आदेशाचे तपशील | **सी.पी(आयबी) क्र. १२१६/एमबी/२०२५** आदेश दिनांक २१.०४.२०२६ |
| ४ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक | २१.०४.२०२६ |
| ५ | दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | राजेश शाह IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881 |
| ६ | ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल (नोंदणीकृत) | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता पत्ता आणि ई-मेल | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १५.०५.२०२६ |
| ९ | संबंधित अर्ज : | पीजी ते सीडी विनियमनांअंतर्गत "फॉर्म बी" वेब लिंक: https://www.ibbi.gov.in/home/downloads |

राजेश शाह
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881
एएफए वैधता ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत
दिनांक: २४.०४.२०२६
ठिकाण: पुणे



**जाहीर सूचना**

(माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ, न्यायालय - I च्या निर्देशांनुसार नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अंतर्गत पारित)

**श्री. शिरीष भाऊ कडू (आरके पाटील इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) च्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी श्री. शिरीष भाऊ कडू यांच्याकरिता आदेश दिनांक २१ एप्रिल, २०२६ द्वारे नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६च्या कलम १०० अन्वये दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
श्री. शिरीष भाऊ कडू यांच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १५ मे, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी निम्नस्वाक्षरीकार ठराव व्यावसायिकाकडे सादर करण्याकरिता आमंत्रित करण्यात येत आहे. दावे इलेक्ट्रॉनिक माध्यमे, नोंदणीकृत टपाल, स्पीड पोस्ट किंवा कुरियरद्वारे सादर करता येतील.
कृपया नोंद घ्यावी: दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | ऋणको/वैयक्तिक जामीनदाराचे नाव | श्री. शिरीष भाऊ कडू |
| २ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | मु.पो. गाव्हण, घर क्र. ९३१, शिवाजी नगर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. |
| ३ | निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्याच्या आदेशाचे तपशील | सी.पी(आयबी) क्र. १२१४/एमबी/२०२५ आदेश दिनांक २१.०४.२०२६ |
| ४ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक | २१.०४.२०२६ |
| ५ | दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | राजेश शाह IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881 |
| ६ | ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल (नोंदणीकृत) | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता पत्ता आणि ई-मेल | ७०१ लक्ष्मीकुंज अपार्टमेन्ट, नवी पेठ, प्रेमानंद सोसायटी समोर, राजेंद्र नगर जवळ, पुणे, महाराष्ट्र ४११०३०. rsshah27@hotmail.com ९९२३७००७१७ |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १५.०५.२०२६ |
| ९ | संबंधित अर्ज : | पीजी ते सीडी विनियमनांअंतर्गत "फॉर्म बी" वेब लिंक: https://www.ibbi.gov.in/home/downloads |

राजेश शाह
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-002/IP-N00592/2018-2019/11881
एएफए वैधता ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत
दिनांक: २४.०४.२०२६
ठिकाण: पुणे

# पनवेल महानगरपालिका




## नागरिकांच्या सोयीसाठी आणि पारदर्शक प्रशासनाच्या दिशेने एक मोठे पाऊल

स्मार्ट डिजिटल सुविधा आता आपल्या सेवेत उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक जलद, सोपी आणि सर्वांसाठी सुलभ करण्याचा हा उपक्रम आहे.

### करमित्र (KARMITRA)

**तुमचा विश्वासू डिजिटल साथीदार**

करमित्र चॅटबॉटद्वारे तुम्ही घरबसल्या मालमत्ता करासबंधी, विविध सेवांबाबत माहिती विचारू शकता तसेच तत्काळ कर भरणा करू शकता. **हा चॅटबॉट 24 x 7 उपलब्ध असून नागरिकांना वेळेची मोठी बचत करून देतो.**

whatsaap चॅटबॉट No. 8956891145



### किऑस्क मशीन

(KIOSK MACHINE)

**झटपट आणि सुलभ पेमेंट सुविधा**

कर भरण्याची प्रक्रिया आता अधिक सोपी आणि जलद झाली आहे. प्रभाग कार्यालयांमध्ये उपलब्ध किऑस्क मशीनद्वारे नागरिकांना QR कोड स्कॅन करून किंवा मोबाईल नंबर टाकून काही क्षणांतच पेमेंट करू शकतात. **रांगांपासून मुक्तता, वेळेची बचत आणि सुरक्षित व्यवहार - हे या सुविधेचे मुख्य वैशिष्ट्य आहे.**

### प्रॉपर्टी पासबुक

(PROPERTY PASSBOOK)

**पूर्ण पारदर्शकता तुमच्या हातात**

मालमत्तेशी संबंधित सर्व माहिती एका क्लिकवर मिळवण्याची सुविधा आता उपलब्ध आहे. डिमांड, कलेक्शन, बाकी रक्कम, मालमत्तेतील बदल आणि व्यवहारांचा संपूर्ण तपशील सहज पाहता येतो. यामुळे **नागरिकांना त्यांच्या कर स्थितीची स्पष्ट आणि अद्ययावत माहिती मिळते.**

**ही सर्व डिजिटल साधने नागरिकांना अधिक सक्षम बनवण्यासाठी आणि प्रशासन अधिक कार्यक्षम करण्यासाठी तयार करण्यात आली आहेत.**

## डिजिटल सुविधा - स्मार्ट नागरिक, स्मार्ट शहर!

## मालमत्ता कर विभाग

# आजच भरणा करुन सवलतीचा लाभ घ्या!

आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर देयके वितरीत करण्याचे कार्य सुरु आहे.

**३१ मे २०२६ पर्यंत करचा भरणा केल्यास चालू मागणीवर तब्बल ५% सूट मिळवा!**

ऑनलाईन भरणा करून अतिरिक्त **२% सूट मिळवा.**

PANVEL CONNECT

मालमत्ता कर भरणा करण्यासाठी
Karmitra PMC & Panvel Connect App
डाउनलोड करा

जा. क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.११७/१२८/२०२६
जा.क्र. पमपा/मालमत्ता कर/४२९७/२०२६
दिनांक - २३/०४/२०२६

@pmc_panvel @pmc_panvel